घटकाभर करमणूक—

१८.

भाद्रपद, शके १८२४.

भुताटकीचें घर.

लेखक,

हरि नारायण आपटे.

POONA UNIV LIBRARY

प्रकाशक,

बाबाजी सखाराम आणि कंपनी

मुंबई.

विक्रीस तयार.

स्त्रियांची परवशता.

यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः ॥

मनुः

प्रसिद्ध इंग्लिश तत्त्ववेत्ता जॉन स्टुअर्ट मिल्ल यानें लिहिलेल्या "Subjection of women" नांवाच्या ग्रंथावरून सदहू पुस्तक रा. सा. गोविंद वासुदेव कानिटकर यांनीं लिहिलें आहे. स्त्रीपुरुषांमधील परस्पर संबंध नैसर्गिक नियमांनीं कोणत्या प्रकारचा असावा, स्त्रिया म्हणजे केवळ पुरुषांच्याच सुखाकरितां देवानें निर्माण केल्या आहेत कीं काय, इत्यादि गोष्टींचा साधकबाधक प्रमाणांनीं वरील पुस्तकांत फार उत्तम प्रकारें विचार केला आहे. मिल्लसाहेबांचा प्रतिपक्षास निरुत्तर करणारा कोटिक्रम इंग्रजी जाणणारांस माहित आहेच. त्याचा परिचय मराठी वाचकांस होण्याचा हा सुयोग रा. सा. कानिटकरांनीं आणिला आहे. हिंदुसमाजानें शिकण्यासारख्या यांत फारच गोष्टी आहेत. पुस्तकाच्या अंतरंगाप्रमाणें बाह्यांगही फारच मनोहर केलें आहे. पृष्ठें क्राऊन १६ पेजी २७५ वर. कापडी बाईंडिंग, किं. १॥ रुपाया, टपाल व्ही. पी. खर्च वेगळा. सदहू पुस्तकामुळें मराठी वाङ्मयात उत्तम भर पडलेली आहे, व त्यास द. प्रा. कमिटीनें बक्षीस दिलें आहे.

बाबाजी सखाराम आणि कंपनी, मुंबई.

"हें पहा, माफ करा. भोळसर, बावळट म्हणून उगीच हंसें करून घेण्याची माझी इच्छा नाहीं, आणखी प्रत्यक्ष 'चक्षुर्वै सत्यं' पाहिल्याखेरीज ज्या गोष्टी खऱ्या वाटाय्च्या नाहींत त्या नुसत्या माझ्या सांगण्यावरून तुम्ही खऱ्या म्हणा असंही मी सांगणार नाहीं. सांगायचं मिळून इतकंच कीं, आम्हीं काय पाहिलं देखलं असेल तें एकीकडेच ठेवा. तें तुम्हांला सांगितलं तर तुम्ही असं म्हणाल कीं, आम्ही आपल्या आपल्याच कल्पनांचे कांहीं तरी खेळ करून फसलों, नाहीं तर दुसऱ्या कोणीं तरी फसवाफसवी करून आम्हांला फसवलं. तेव्हां तें नाहीं मी तुम्हाला सांगत; त्या घरांत पाहिल्या देखल्या गोष्टीमुळेंच आम्हीं तें घर इतक्या लवकर सोडलं असं नाहीं; पण त्या बंगल्यांत एक खोली आहे, त्या खोलीजवळ जाण्याबरोबर अशीं आम्ही दोघंही घाबरत असूं कीं कांहीं कमाल! त्या खोलींत आम्हांला कांहीं भयंकर दिसलं किंवा कशाचा भयंकर भास झाला, असं मुळींच नाहीं. शेवटीं सगळ्यांत मोठं आश्चर्य हें कीं, तिसरी रात्र काढल्यानंतर आतां चवथ्या दिवसाचा एक ताससुद्धां काढायचा नाहीं असं माझ्या बायकोप्रमाणें मलाही वाटूं लागलं. चवथा दिवस उजाडतांच त्या बंगल्यांत खालीं एक म्हातारी बाई राहत असे तिला सांगितलं कीं, आमची कांहीं इथें राहण्याची सोय जमत नाहीं; तेव्हां आम्ही बिऱ्हाड सोडून जाणार." तें माझं बोलणं ऐकतांच ती म्हातारीबाई मला म्हणाली "तुम्ही कां जातां, तें मला सगळं कांहीं समजलं आहे. तुम्ही राहिलांत इतकं आजपर्यंत कोणी राह्यलं नाहीं. दोन रात्रीसुद्धां फारच थोडे

लोक राहिले, आणखी तिसरी रात्र काढलीत अशी तुम्हीच. मला वाटतं तुमच्यावर त्यांची थोडी मेहरबानी होती."

"त्यांची? त्यांची कोणाची?" मीं किंचित् हंसून तिला म्हटलें.

"त्यांची म्हणजे ज्यांनीं हें घर झपाटलं आहे त्यांची, मग ते कोणी कां असेनात! आज नोकर म्हणून मी इथें राहिलें आहे, पण एकदां हाच बंगला मीं भाड्यानं घेतला होता, त्याला फार-फारच वर्षं झालीं पण तेव्हांपासून त्यांची मला माहिती आहे. मला त्यांचं कांहींच वाटत नाहीं. पण एवढं मला पक्कं समजून चुकलं आहे कीं, मला त्यांच्याच पायीं मरण येणार आहे. मी आतां म्हातारी झालें आहें, तेव्हां मला त्याचं कांहींच वाटत नाहीं. कधीं तरी लवकरच मरायचं. मेलें म्हणजे मी त्यांच्यांतच मिसळणार, आणखी पुनः या घरांतली याच घरांत कायम रहाणार!" ती म्हातारी इतक्या शांत व निर्भयपणानें हें सर्व बोलली, कीं मला तिचंच भय वाटायला लागून पुढें तिच्याशीं बोललों सुद्धां नाहीं. मुकाट्यानं तिला ठरविल्याप्रमाणें महिन्याचे पैसे देऊन तेथून आम्ही चालते झालों. थोडक्यांतच निभावलं, आपण सुटलों, असं उलटं आम्हांला वाटूं लागलं. महिन्याचं भाडं बारा रुपये विनाकारण गेल्याचं कांहींच वाटलं नाहीं."

"वा!" मीं आपल्या स्नेह्यांस म्हटलें, "तुम्हीं ही हकीकत सांगून आमची उत्सुकता बरीच जागृत केलीत. अशा भुताटलेल्या घरांत आपण एक रात्र जाऊन निजणार बोआ. आपण ज्या घरांतून इतके भेदरून निघालां, त्याचा आम्हांला पत्ता तर द्या."

आमच्या मित्रांनीं आम्हांला पत्ता तर दिला. आणि इतर कांहीं गप्पा सप्पा होऊन मी त्यांचा निरोप घेऊन निघालों, तो त्यांनीं दिलेल्या पत्यावर जाऊन त्या घराचा आधीं शोध केला. रंगारी मोहोल्याच्या उत्तर बाजूला एक गल्ली आहे, त्या गल्लींत तें घर होतें. मी जाऊन पहातों, तों तें घर अगदीं बंद होतें. त्याच्यावर पाटी नाहीं, कांहीं नाहीं. ठोठाव ठोठाव ठोठावलें, तरी कोणी ओ देईना. तेव्हां त्रासून मी परतण्याच्या बेतांत होतों, इतक्यांत एक पानवाल्याचा पोऱ्या हातांत पानाच्या पुड्या घेऊन चालला होता, तो मला पाहून म्हणतोः "काय वो ? ये घरांतला कुनी पायजे काय तुम्हांस्नी ?"

"हो. हें घर भाड्यानं द्यायचं आहे असं मीं ऐकलं म्हणून आलों."

"भाड्यानं पायजे ?–अवो ह्ये घरामंदी येक म्हातारी व्हती ती तर आज पंधरा दिस झाल म्येली, तवांपासून कोनीबी भाडोत्री येइतना ना जाइतना. घराच्या शेटानू बगा महिन्यास्नी येक रुपया भाडां केलान् पन कोनबी भाडोत्रीच गवसना. माज्या आयशीला रोजच फकत झाडन्यासाठीं चार रुपये दरम्हा केलांन् श्येटनं, पन् ती म्हनूती नग बा, त्ये चार रुप्ये बी नग अन् त्ये घरांत जायास बी नग."

"तें रे कां ? अरे चार रुपये कां नकोत ?"

"अवो, ह्ये घरांत भुतां लई ! ती डोशी होतीना ती आंथरुनांत कांबरुनांत म्येलेलीच गवासली. तिच डोळ बगा अस्स उघड ताट. भुतानू मारली तिला भुतानू !"

"ह्यः वेड्या! बरं घराचे शेट राहतात कुठें तुला ठाऊक आहे?"

"हो."

"ती त्या पल्याडल्या गल्लीमंदी म्होटी थोरली बावडी हायना, तिच्यापसली ती थोरली वाडी ती शेटचीच वाडी बगा."

मी त्या पोऱ्याला त्याच्या मेहेनतीबद्दल एक दिडकी दिली, आणि लागलीच त्या घराच्या मालकाकडे चाललों. आमच्या नशिबानें शेट घरीं होते. मनुष्य चांगला पोक्त वयाचा, बोलूनचालून मोठा चांगला असा दिसला.

मीं लागलीच आपलें नांव, गांव, धंदा आणि आपला त्याला भेटण्याचा हेतु स्पष्टपणें सांगितला. मीं म्हटलें: "मीं असें ऐकलें आहे कीं, पलीकडच्या गल्लींतलें आपलें घर भुताटलेलें आहे. ज्या घराची अशी कीर्ति झाली आहे, अशा घरांत जाऊन एखादी रात्र तरी काढण्याची मला अतोनात उत्कंठा आहे. आपण जर तें निदान एक रात्र तरी भाड्यानं देत असाल, तर मोठी मेहेरबानी होईल. आपण जें मागाल तें भाडं देण्याला मी तयार आहें.

माझें तें बोलणें ऐकून तो गृहस्थ मला मोठ्या शांतपणें म्हणाला, "जितका वेळ आपल्याला तें घर पाहिजे असेल, तितका वेळ तें आपल्या ताब्यांत देण्याला माझी मुळींच हरकत नाहीं. एक रात्र घ्या कीं एक वर्षभर घ्या. भाड्याची गोष्टच बोलायला नको. त्या घरांत जे चमत्कार घडतात, त्यांच्यामुळें आज त्या घराचं कवडीसुद्धां

कोणी भाडं देत नाहीं. विकायला काढलं तर कोणी विकत घेत नाहीं. तेव्हां आपण चार दिवस तिथें राहून जर त्या चमत्काराचं कारण शोधून काढलं, तर आमच्यावरच उलटा उपकार होणार आहे. तें घर झाडून लोटून स्वच्छ ठेवायला कोणी गडी मिळेना, मग भाडोत्र्याचं नांव कशाला? त्यांत आणखी कमनशिबाची गोष्ट ही कीं, त्या घरांत रात्रींच भुताटकीचे चमत्कार दिसतात असं नाहीं, तर भरदिवसा दोन प्रहरींही दिसतात! फरक एवढाच कीं, रात्रीं जे चमत्कार दिसतात, ते बरेच भयंकर असतात. जी म्हातारी पंधरा दिवसांपूर्वीं त्या घरांत वारली, ती मी अशीच आणली एका ठिकाणाहून. तिला आगापिछा कांहीं नव्हता. पूर्वीं ती चांगली श्रीमंत होती. तेंच घर आमच्या चुलत्यापासून तिच्या नवऱ्यानें भाड्यानें घेतलें होतें. पण पुढें तिचा काळ फिरून, नवरा मेला, मुलंबाळं मेलीं, तिची अन्नान्नगत झाली, इकडे तिकडे तुकड्यासाठीं हिंडू लागली, तेव्हां मी तिला शोधून आणून त्या घरांत ठेवली. ती बाई मात्र राहिली बोआ, नाहीं म्हणायला आज किती वर्षें तिथें! पण ती मेली एकाएकीं आणखी तिच्या प्रेताची परीक्षा झाली पंचांसमक्ष कारोनरच्या हातून. तेव्हांपासून त्या घराचं नांव फारच बद्दू होऊन जिकडे तिकडे पसरलं. त्याला भाडोत्री मिळण्यासंबंधानें माझी तर इतकी निराशा झाली कीं, जो कोणी मुनिसिपालिटीचे सगळे कर भरायला कबूल असेल त्याला तेवढ्यावारी अगदीं एक वर्षाच्या करारानें मीं तें घर देण्याचा बेत केला आहे.”

"त्या घराला ही भुताटकी कधींपासून झाली असावी?"

"तें सांगणं मोठं कठिण आहे. कारण माझ्या
न्माच्या आधींपासून त्या घराची स्थिति आहे तशी आहे.
ी म्हातारी मेली, ती म्हणे कीं आपल्या जन्माच्या आधीं-
ासून तें भुताटलेलें असें लोक म्हणतच असत. मी आधीं
ींच वर्षं इथें नव्हतों. चाकरीच्या निमित्तानं अगदीं
ांब लांब असें. घरांत कोणी वडील माणसं नाहींशी
ालीं, इकडची इस्टेटीची व्यवस्था तर पहाणें जरूर, म्हणून
ग तिजाईच पेन्शन घेऊन आलों झालं. आलों तों या
रासंबंधानें पुष्कळ खटपट केली. मला आधीं किती
ेवस खऱ्याच वाटेनात त्यांच्या भुताटकीच्या गोष्टी. मीं
ोडाबहुत पैसा खर्च करून त्याला चांगलं शोभिवंत केलं,
ाणखी एका गृहस्थाला एका वर्षाच्या करारानं भाड्यानं
देलं. भाड्यानं दिलं ते गृहस्थ साहेब होते. त्यांची
ायको, एक मुलगा, एक मुलगी, आणखी चार पांच
ोकर. पण गृहस्थांनीं दुसरेच दिवशीं घर सोडण्याचा
नेश्चय केला. घरांतल्या प्रत्येक माणसाला कांहींना कांहीं
ारी निराळाच भयंकर प्रसंग दिसून जो तो भेदरून गेला
एकाला जें दिसलें तें दुसऱ्याला नाहीं, पण प्रत्येकाल
देसलें तें कांहीं तरी अत्यंत भयंकर. साहेब मूळचे कर्नल
होते. पण तेही जेव्हां अतिशय घाबरलेले दिसले
ेव्हां मला खास वाटलें कीं, घरांत कांहीं तरी विलक्ष
प्रकार असावा खरा. वास्तविक त्यांचा माझा एक व
करार होता, पण तो पुरा करण्याविषयीं मीं कांहीं

धरली नाहीं. मग मघाशीं सांगितलेल्या त्या म्हाता-रीला ठेवली. आणखी तिला खोल्याखोल्यांनीं बिऱ्हाडं आलीं तरी ठेवण्याचा मीं अधिकार दिला; पण व्यर्थ! तीन दिवस सतत राहिला असा भाडोत्री एक मिळाला म्हणून ती म्हातारी म्हणाली. बाकी सगळे एक दिवस दोन दिवस म्हणजे शिकस्त झाली! त्या सगळ्या भाडो-त्र्यांना काय दिसलं, काय भास झाले याच्या गोष्टी मीं कांहीं तुम्हांला सांगत नाहीं. दोन भाडोत्र्यांना फार तर काय, दोन माणसांना एकच चमत्कार कधीं दिसला नाहीं. तेव्हां दुसऱ्यांच्या गोष्टी ऐकून आधींच तुमच्या मनाला हुरहुर लावणं कांहीं बरोबर नाहीं. मात्र कांहीं तरी विलक्षण, भयंकर असं आपल्याला दिसणार अशी मनांत खात्री बाळगून तिथें जा. आपल्या काय सावध-गिऱ्या करायच्या त्या सगळ्या करून, काय घ्यायचं तें घेऊन असे जा म्हणजे झालं. सामानसुमान, खुर्च्या, टेबलं, कोंच, बाकं, रगड सामान तिथें आहे, साहेबलोक तिथें राहतात म्हणून त्यांच्या चालीच्या शेगड्याही तेथें आहेत."

मीं शेटजींस विचारलें. "पण कायहो? आपण स्वतः एक रात्र तेथें जाऊन रहावें आणि काय चमत्कार आहेत ते पहावे अशी उत्सुकता नाहीं आपल्याला कधीं झाली?"

"हो. हो. झाली तर. मी रात्र नाहीं घालविली ग्रांत. पण दिवसाढवळ्या तीन तास काढले, आणखी तेवढ्या तीन तासांच्या वस्तीनंच आमची जिज्ञासा, आमची उत्सुकता तृप्त झाली. चांगली जिरली, निवली म्हटलें

तरी चालेल. माझ्या दृष्टीस काय पडलें तें मात्र मी सांगत नाहीं तुम्हांला. पण पुनः तिथें जाऊन एक तास-भर बसावं अशी आपल्याला कांहीं इच्छा नाहीं. इकडे पहा, मीं सगळ्या गोष्टी स्पष्टपणानं सांगितल्या नाहींत अशी कुरकुर करायला तुम्हांला जागा ठेवीत नाहीं. उलट माझं आपल्याला असं सांगणं आहे कीं, आपण जर विल-क्षण धीराचे असलां किंवा आपली जिज्ञासा फारच अनावर झाली असली, तर कांहीं म्हणणं नाहीं, पण तसं जर कांहीं नसलं, तर आपण कांहीं तिथें एखादी रात्र काढण्याच्या विचारांत पडूं नये तें चांगलं."

मीं तत्काळ त्यांस म्हटलें, "माझी जिज्ञासा तर अत्यंत अनावर झालीच आहे. धीटपणाबद्दल म्हणाल, तर तें आपल्याच तोंडानं सांगणं म्हणजे उगीच बढाई मारल्यासा-रखं होणार आहे. पण मजवर असे भयंकर प्रसंग आले आहेत कीं कांहीं सांगण्याची सोय नाहीं; आणखी मी त्यांतूनही निभावून धीरानं बाहेर पडलों आहें. तेव्हां भुताटकीच्या घरांतच तो माझा धीर सुटेल, असं मला तर कांहीं वाटत नाहीं."

माझें असें बोलणें ऐकल्यावर तो गृहस्थ कांहींही अधिक बोलला नाहीं. चटकन् उठून त्यानें घराच्या किल्ल्या आणून माझ्या स्वाधीन केल्या. मीही त्याचा एकंदर उघडपणा, व सरळपणा याबद्दल, त्याचप्रमाणें आपल्या म्हणण्याला मान देऊन आपल्याला घर देण्याबद्दल मनापा-सून, आभार मानून तेथून निघालों. त्या किल्ल्या म्हणजे मला एक मोठें थोरलें बक्षीसच मिळालेंसें वाटत होतें.

आतां केव्हां एकदां काय तो अनुभव घेण्यास आपल्याला सांपडेल असें मला होऊन गेलें होतें, तेव्हां घरीं जातांच मीं आपल्या अत्यंत धीट व विश्वासू गड्याला हांक मारली. हा गडी मोठा आनंदी व मी सांगेन त्या कामांत अगदीं तत्पर असे. गडी अगदीं जवान व मजवर त्याची पूर्ण भक्ति. मी स्वतः उत्तर हिंदुस्तानांत हिंडत असतां काशीस प्रथम तो मजजवळ राहिला. भीति कशी ती त्याला मुळींच ठाऊक नव्हती!

मीं त्याला म्हटलें, "जवान, सगळ्या उत्तर हिंदुस्तानांत हिंडलों, पण कुठें सुद्धां आपल्याला भुतं पहायला सांपडलीं नाहींत. मथुरेस आपल्याला एक वाडा दाखवला, आपण त्यांत राहिलों, पण आपल्याला पाहून भुतं कशीं पळालीं तें तुला ठाऊकच आहे; तसंच त्या घरांत मुंडक्यांवांचून असं भूत दिसे असं सांगत तें? पण तें असो. आज खुद्द या मुंबईशहरांत एक भुतांचं घर आढळलं आहे. आणखी आपण तर त्या घरांत जाऊन आजची रात्र निजण्याचा निश्चय केला आहे. आतांपर्यंत ज्या गोष्टी मीं ऐकल्या, त्यावरून या घरांत कांहींना कांहीं तरी आहे. कांहींना कांहीं आपल्या नजरेस किंवा कानावर पडणार— आणखी तें पडेल तें कांहीं तरी फार विलक्षण, फार भयंकर असणार, असं मला वाटतं आहे. तर बोल. तुला बरोबर नेला तर तूं घाबरून जाणार नाहींसना? काय पाहिजे तें घडलं, तरी आपला धीर कधीं सुटायचा नाहीं अशी तुझ्या मनाची खात्री आहे का?"

माझे हे प्रश्न ऐकण्याबरोबर आनंदानें हंसून तो म्हणतो

" हें काय सरकार? माझ्याबद्दल अजून आपली खात्री नाहीं?—"

" बरं तर. ह्या घे घराच्या किल्या. तें घर आज कित्येक दिवसांत झाडलं सारवलेलं नाहीं. तें नीट झाड. एखादी सुंदर खोली असेल, तिथें माझ्यासाठीं एक पलंग घाल. पलंग त्या घरांत आहेत. सामानसुमान रगड आहे. बिछाना छानदार कर. बरोबर कंदील मेणबत्या वगैरे घे. माझा तो जंब्या आणखी तें पिस्तुल अशीं दोनही घे. तूं आपलीं सोडगी घे. पंचवीस पिशाचं जरी आलीं तरी त्यांचा समाचार घेतां येईल अशी तयारी करून जा म्हणजे झालं."

बाकीचा सगळा माझा दिवस कामांतच गेला. काम मोठें महत्त्वाचें असल्यामुळें त्या भुताटकीविषयीं व त्यासंबंधानें साहस करणार होतों त्याविषयीं विचार माझ्या मुळींच मनांत घोळले नाहींत. मला त्याविषयीं विचार करण्यास फुरसतच झाली नाहीं. मी घरीं जेवलों. घरांत कोणाला कांहीं सांगितलें नाहीं. बाहेर कामाला जातों, रात्रीं येणार नाहीं एवढेंच सांगितलें. आणि एक सुंदरसें नावेल नुकतेंच विकत घेतलें होतें तें बरोबर घेऊन निघालों. तें फार चांगलें असून त्यांत मन रमण्याजोगें होतें, शिवाय त्यांत भुताटकीचें असत्यत्व दाखविलें होतें असेंही माझ्या एका स्नेह्यानें मला सांगितलें होतें. तेव्हां झोंप न आल्यास तें पुस्तक वाचण्यांत रात्र काढावी असें मनांत येऊन तें घेतलें.

मी सुमारें साडेनऊ वाजतां तें पुस्तक खिशांत घालून घराच्या बाहेर पडलों. माझ्याबरोबर माझा आवडता बुल-डॉग् मीं घेतला होता. त्या कुत्र्यासारखा धीट, साहसी व जागरूक कुत्रा आजपर्यंत मीं पाहिला नाहीं. विलक्षण अंधाऱ्या अशा रात्रीं कोंपऱ्या कोंपऱ्यांतून हुंगीत हुंगीत हिंडण्याची त्याला मोठी संवय. रात्र पडली कीं, घुशी शोधून काढून त्यांचा फडशा उडविण्याचा त्याचा एक-सारखा उद्योग चाले.

उन्हाळ्याचे दिवस परंतु रात्र बरीच थंड होती. चंद्र उगवला होता. मी त्या घरापाशीं तर जाऊन पोंचलों, दार वाजविलें, माझ्या नौकरानें हंसत हंसत दार उघडलें व मी एकदांचा आंत गेलों.

"कसं कायरे बोआ?" मी सहजच त्याला विचारलें.

"कांहीं नाहीं. सगळं कांहीं ठीक आहे."

तें त्याचें उत्तर ऐकून माझी थोडीशी निराशा झाली. रात्रीं तर काय पण दिवसासुद्धां नानातऱ्हेचे चमत्कार दृष्टीस पडतात व शब्द ऐकू येतात असें मालकानें सांगि-तलें होतें, आणि हा तर म्हणतो सर्व कांहीं ठीक आहे. तेव्हां हें आहे तरी काय? सगळेंच फसणार? असें मनांत आलें व मीं त्यास म्हटलें "काय? कांहीं सुद्धां विशेष घडलें नाहीं? कांहीं ऐकू आलें नाहीं?"

"सरकार, कांहीं चमत्कारिक ऐकू आलं खरं."

"काय? काय तें?"

"चारदां पांचदां माझ्या पाठीमागें कोणी तरी चालतें आहे असें वाटलें. चांगला पावलांचा आवाज ऐकू आला.

आणि एकदां दोनदां कोणी तरी अगदीं माझ्या कानाजवळ येऊन कुजबुजलेंसेंही वाटलें. याच्यापलीकडे आणखी कांहीं सुद्धां झालं नाहीं."

"पण तूं घाबरलाबिबरला नाहींसना अजून? तुला भय नाहींना वाटायला लागलं?"

"मी? मी घाबरतों आहें! अणुमात्र मी घाबरलों नाहीं." त्याच्या चेहऱ्यावरूनही तेव्हांच मला वाटलें, कीं तो मुळींच घाबरला नव्हता. इतकेंच नव्हे तर काय पाहिजे तो जरी प्रसंग आला, तरी आपल्याला तो सोडणार नाहीं अशाबद्दल माझी खात्री झाली.

रस्त्यावरला दरवाजा लावून आम्ही मधल्या दिवाणखान्यांत आलों, तेव्हां माझी नजर सहज माझ्या कुत्र्याकडे गेली. पहिल्यानं तो माझ्याबरोबर आला, तो मोठ्या उत्सुकतेनं आणखी आवेशानंच आंत आला; पण दार लावल्याबरोबर थोड्याच वेळांत शेंपूट मागल्या दोन पायांच्यामध्यें जाईल तितकें घालून तो दाराजवळ गेला व पायानें खरवड खरवड खरवडून, तें कोणी तरी उघडा[illegible] म्हणून किंचाळूं लागला. मी लागलाच त्याच्याजवळ गेलों. त्याच्या डोक्यावरून व पाठीवरून हात फिरवून त्याला थोडेंसें उत्तेजन आणलें, त्याबरोबर तो परतला. परंतु आम्हांला दोघांना अगदीं चिकटून चालत होता. नाहीं तर तो म्हणजे आमच्या अगदीं पुढें जायचा व सर्व कोनेकोपरे धुंडाळून यायचा. आम्ही पहिल्या प्रथम निघालों ते मागल्या बाजूच्या जागा, सैंपाकघर, माजघर वगैरे पहाण्यास गेलों. एका बाजूस एक तळघर होतें तेंही पाहिलें. ते[illegible]

दोन तीन दारूच्या बाटल्या दिसल्या, त्या कदाचित् त्या कर्नलसाहेबांच्या वेळच्या असतील असें मला वाटलें. व त्या घरांत नांदणारीं भुतें दारू पिणारीं दिसत नाहींत असें मला वाटलें. कारण तीं दारू पिणारीं असतीं तर एव्हांना त्या बाटल्यांत थेंब सुद्धां राहताना. याच्याखेरीज त्या भागांतून आम्हांला कांहीं सुद्धां विशेष दिसलें नाहीं. मागल्या बाजूला थोडेंसें परसूं होतें, तें उंच भिंतींनीं बांधलेलें होतें. त्या परसाची जागा ओलसर अशी होती व त्यावर पावलें तेव्हांच उमटत. आमचीं पावलें उमटलेलीं आम्हांला दिसलीं आणि या भुताटकीच्या घरांत पाऊल घातल्यापासून आतांच कायतो मला अगदीं पहिला चमत्कार दिसला. माझ्या हातांतल्या कंदिलानें मी खालची जमीन पहात होतों, इतक्यांत एकाएकीं माझ्या पुढें दोन पावलें उमटलेलीं मला दिसलीं, तीं एकदम अगदीं एकाएकीं तेथें बनलीं. बनतां बनतां मला दिसलीं. मीं लागलींच आपल्या नोकराचा हात धरला व त्यास तीं दाखविलीं. त्या पावलांच्या पुढें तितक्याच चट्कन् आणखी एक पाऊल उमटलें. आम्हीं दोघांनींही तें पाहिलें. मी झट्कन् पुढें झालों, तों तें पाऊल माझ्या पुढें ठेवलेलेंच! पाऊल फार लहान. एखाद्या लहान मुलाचें होतें. त्याचा आकार कसा होता हें स्पष्टपणें ओळखण्याइतकें स्पष्ट मात्र तें दिसलें नाहीं. आम्ही समोरच्या भिंतीजवळ गेलों तेव्हां हा चमत्कार नाहींसा झाला व आम्ही परत फिरलों, तेव्हां पुनः कांहीं तो घडला नाहीं. आम्ही पुनः वर सैंपाकघराकडे गेलों. स्वयंपाकघराखेरीज खालीं एक जेवायला बसायची

जागा, एक कोठीची व दुसऱ्या दोन खोल्या होत्या. नंतर मी पुनः माजघराच्या पुढच्या खोलींत आलों व तेथें एक ईझी चेअर (आरामखुर्ची) पडली होती तीवर बसलों. कंदिल जवळ ठेवला. मी नोकराला पुढलें दार लावण्यास सांगितलें. तो तसें करण्यास जों वळतो, तों माझ्या समोरच भिंतीस एक खुर्ची होती ती तरातरा तरातरा आपोआप पुढें सरकत आली! तिचा कांहीं आवाज झाला नाहीं कांहीं नाहीं. जी एकदम आली, ती बरोबर माझ्या समोरच येऊन एका यार्डाच्या अंतरावर थबकली.

"वा! ही एक विलक्षणच मौज आहे म्हणायाची?" असें म्हणून मी थोडा मोठ्यानें हसलों व त्या हंसण्याबरोबर माझा कुत्रा मोठमोठ्यानें भोंकूं लागला.

प्रकरण २ रें.

माझा नौकर दार लावून परत वळला. त्यानें त्या खुर्चीचें तरातरा येणें पाहिलें नव्हतें, यामुळें त्याला कांहीं विशेष वाटलें नाहीं. तो त्या कुत्र्याला गप्प करण्याच्या नादाला लागला. मी आपला एकसारखा त्या खुर्चीकडे पाहूं लागलों. पहातां पहातां मला असें वाटलें कीं, तीवर आपल्याला निळसर रंगाची अशी मनुष्याची आकृति अगदीं अंधुक दिसली. पण ती इतकी अंधुक दिसली कीं, मला नुसता भासच झाला असें वाटून मी तिकडे दुर्लक्ष्य केलें. आतां कुत्रा अगदीं स्वस्थ बसला होता.

मीं आपल्या नौकरास म्हटलें, "अरे, ही माझ्या समोरची खुर्ची मागें सारून ठेव. अगदीं भिंतीशीं लावून ठेव."

माझ्या नौकरानें मीं सांगितल्याप्रमाणें केलें. पण मधेंच एकदम माझ्याकडे वळून म्हणतो, "काय? आपणच का, रावसाहेब!"

"मी! मी काय?" मीं त्याला विचारलें.

"अं? मला आतां खांद्यावर कोणी जोरानें चपराक मारली? या इथें खांद्यावर सडकूनच बसली."

"छे. मी जागचा उठलों सुद्धां नाहीं, बाबा! पण गड्या, मला वाटतं इथें हातचलाखी, करणारे गारुडी असे कोणीतरी लोक असावेत. त्यांच्या चलाख्या जरी आपणाला पकडायला आल्या नाहींत, तरी त्यांना स्वतःला तरी पकडूंच पहा बरं! त्यांच्या असल्या चलाख्यांनीं भेदरून कांहीं इथून निघून जाणार नाहीं. त्या खोलींत मग आम्हीं फार वेळ बसलों

नाहीं. तिथें फारच दमट चिमट असा वास येत होता. त्या खोलीला व इतर सर्व खोल्यांना कुलपें घालून आम्हीं माडीवर गेलों. आतांपर्यंत ज्या ज्या खोल्यांतून किंवा जागांतून आम्ही जाऊन आलों, त्या त्या खोल्यांना कुलपें घालण्याची पक्की खबरदारी घेतली. पहिल्या मजल्यावर जी काय उत्तम खोली होती, तींत माझा बिछाना माझ्या नोकरानें घातला होता. रस्त्यावर त्या खोलीला दोन खिडक्या होत्या. पलंग चांगला मोठा होता. एका बाजूच्या भिंतीला खिडकी आणि याच्या दरम्यान् एक दार होतें. त्या दारांतून पलीकडे एका लहानशा खोलीकडे जाण्यास वाट होती. त्या लहानशा खोलींत गड्यानें आपली निजण्याची जागा केली होती. त्या खोलींतून माझ्या खोलीखेरीज कोठेंही जाण्यास रस्ता नव्हता. माझ्या खोलींत बिछान्याच्या समोरच्या भिंतीला दोन फडताळें होतीं. त्यानां कुलूप वगैरे कांहीं एक नव्हतें. मीं हीं फडताळें तपासून पाहिलीं. त्यांच्या दारास मोठमोठाले हूक मात्र होते. ते कोणी कर्नलसाहेब राहत असे त्यानें आपल्या सोईकरितां कदाचित् मारले असावेत. आम्हीं दर भिंतीपाशीं जाऊन त्या पोकळ आहेत कीं काय हे पहाण्यासाठीं ठोठावून पाहिलें. पण तसें कांहीं नव्हतें. चांदईच्या भिंती चांगल्या भक्कम होत्या. याप्रमाणें खोल्यांची एकंदर तपासणी झाल्यानंतर कांहीं वेळपर्यंत मी स्वस्थपणें विडी ओढीत बसलों. नंतर आपली एकंदर घराची तपासणी पुरी करण्यासाठीं पुनः बाहेर पडलों. माझा नोकर माझ्याबरोबर होताच. जिन्याच्या जवळच पली-

कडच्या बाजूस एक दरवाजा होता. हा दरवाजा उघडून आंत काय आहे तें पहावें, म्हणून मी दार लोटूं लागलों; तों तें लागलेलें. तें पाहून माझा गडी आश्चर्याची मुद्रा करून मला म्हणाला, " अहो, मी दोनप्रहरीं घरांत येण्याबरोबर सगळे दरवाजे उघडे करून टाकिले आणि आंतून दरवाजा लागणें कांहीं मला शक्य दिसत नाहीं, कारण—" त्याचें तें वाक्य पुरें होतें न होतें तोंच दरवाजा, आमचा कुणाचा त्यास स्पर्शही न होतां आपोआप, जणूं काय कोणी आंतून उघडल्याप्रमाणें सावकाशपणें उघडला. आम्हीं दोघांनीं एकदम क्षणमात्र एकमेकांकडे पाहिलें. दोघांच्याही मनांत एकच विचार आला असावा. आतां येथें कोणी तरी माणूस खास सांपडणार असें वाटून मी सपाट्यानें आंत शिरलों व माझ्या मागोमाग माझा नौकरही आला. ती खोली अगदीं रिकामी, पुष्कळ धुरळा पडलेली अशी होती. खिडक्या बंद असून त्यांच्या झडपा बऱ्याच दिवसांत मुळींच उघडल्या नसाव्यात असें स्पष्ट दिसत होतें. आम्ही ज्या दरवाज्यानें आलों त्या दरवाजाखेरीज दुसरा दरवाजा त्या खोलीस नव्हता. खोलीमध्यें सतरंजीफितरंजी कांहीं नव्हतें. एकही माणूस तेथें दिसला नाहीं व माणसाला लपण्यास जागा असेल असेंही संभवनीय वाटलें नाहीं. सगळीकडे नीटपणें न्याहाळून पहात असतां एकाएकीं ज्या द्वारानें आम्ही आंत आलों तें दार उघडलें त्याप्रमाणेंच आपोआप झांकलें, आणि आम्ही आंत कोंडले गेलों.

मी कांहीं सांगतां सुमार नाहीं अशा तऱ्हेनें आतां पहिल्या प्रथम भ्यालों. माझ्या अंगांवर कांटा उभा राहिला.

नौकर मात्र बिलकुल घाबरला नाहीं. उलट संतापून मला म्हणतो, "अशा तऱ्हेनें हें आम्हांला पकडण्याचा बेत करि-तात काय मादरचोद? एक लाथ मारीन तर हें भिकारडें दार मोडून टाकीन." मला वाटलेलें भय मीं एकदम एकीकडे झुगारून स्वस्थपणें त्यास म्हटलें, "अरे, आधीं हातानें दार उघडतें का नाहीं तें पहा. तोंपर्यंत मी या खिडकीच्या झडपा उघडून बाहेर कोणी आहे कीं काय तें पहातों." मी लागलींच एका बाजूच्या खिडकीच्या झडपा उघडल्या व हल-केच बाहेर पाहूं लागलों. ती खिडकी पाठीमागल्या परसावर होती. तेथून कोठें चढण्याला किंवा कांहीं करण्याला मुळींच मार्ग नव्हता. त्या खिडकींतून जर कोणी उतरूं म्हणेल तर त्याला पाय ठेवण्यास कोठेंही जागा नव्हती. उडी टाकील तर खास मरेलच अशी स्थिति होती, कारण खालीं दगडाची फरशी!

इकडे आमचा जवान त्या दाराशीं खूप झटापट घेत होता. परंतु ती सर्व व्यर्थ जाऊन तो मजकडे वळून मला म्हणाला, "सामोपचारानें तर हें दार उघडत नाहीं. जोर लावूं का सांगा?" तो त्याचा प्रश्न ऐकून मी थोडासा आश्चर्यानें त्याच्याकडे पाहूं लागलों. गडी माणूस असून त्यानें या प्रसंगी जें धैर्य दाखविलें तें विशेष होतें यांत बिलकुल शंका नाहीं. त्यानें भुताटकीचा प्रसंग म्हटला म्हणजे वास्तविक किती तरी घाबरून जावयाचें; परंतु तो असल्या या विल-क्षण प्रसंगींही अगदीं शांत आहे, असें पाहून मला त्याचें फार कौतुक वाटलें; आणि अशा प्रसंगीं आपल्याबरोबर हा असा गडी आहे हें पाहून मनाला आनंदही झाला. मीं

लागलीच त्याला पाहिजे होतें तें करण्यास परवानगी दिली. तो भला चांगला जवान होता हें मीं अनेकवार वर सांगितलेंच आहे. त्यानें होता नव्हता तो सगळा आपला जोर एक करून त्या दाराला लाथ मारिली. परंतु तें दार अणुमात्र हाललें नाहीं कीं नुसतें हादरलें देखील नाहीं. तेव्हां आणखीही बऱ्याच लाथा त्या दारावर झाडून अगदीं चांगलीच दमछाट होऊन आमचे जवानसिंग खालीं बसून धापा टाकूं लागले. आपणही आपली ताकद त्या दारावर चालवून पहावी म्हणून मी बऱ्याच लाथाबुक्यांचा वर्षाव त्यावर केला. परंतु जी जवानसिंगाची गत तीच आमचीही झाली. निराश होऊन आम्ही आपले दीर्घ प्रयत्न सोडून स्वस्थ बसलों, तों पुन्हां एकदां पहिल्याप्रमाणें माझे अंगावर थरथरून कांटा उभा राहिला. मला एकाएकीं असें वाटलें कीं, मनुष्याच्या प्राणास अत्यंत घातक अशा विषारी वाफा खालच्या जमिनींतून निघून सर्व खोलीस व्यापून टाकीत आहेत. दार तर लागलेलेंच. एक तेथें राहून त्या विषारी वाफांनीं दम कोंडून घेऊन प्राण द्यावा किंवा खिडकीवाटे उडी टाकून डोकेंबिकें फोडून घेऊन प्राण द्यावा, याखेरीज गत्यंतर दिसलें नाहीं. परंतु आमचें नशीब मोठें थोर. पहिल्याप्रथम तें दार जसें उघडलें व पुन्हां आपोआप लागलें, तसेंच आतां पुन्हां उघडलें. त्याबरोबर एकदां बाहेर कसे पडूं असें होऊन आम्हीं दोघेही एकदांचे बाहेर घुसलों. बाहेर पडतों तोंच आमचे दृष्टीस एक विलक्षणच चमत्कार पडला. मनुष्याच्या आकृति इतका मोठा परंतु ज्याला कांहीं आकार नाहीं, रूप नाहीं असा

अंधुक अंधुक प्रकाशाचा कोळच्या लोळ आमच्यापुढें माळ्याला जाणाऱ्या जिन्यावरून वर चालला आहे असे दिसलें. मी त्या प्रकाशाच्या पाठीमागें चाललों होतों व माझ्या पाठीमागून माझा नौकरही येत होता. तो प्रकाशाचा लोळ जिन्याच्या वरच्या तोंडाशीं गेल्यावर एका बाजूस एका लहानशा माळ्याचें दार उघडें होतें त्यांतून आंत शिरला. त्याबरोबर मीही आंत गेलों. तो प्रकाश एकदम लहान लहान होत जाऊन त्याची अगदीं लहान अशी गोळी बनली. ती गोळी फार तेजःपुंज दिसत होती. तिच्याकडे पाहिलें म्हणजे डोळे दिपून जात. ती गोळी तेथेंच कोपऱ्यांत एक लहानसा बिछाना होता त्यावर गेली, व होतां होतां एकदम नाहींशी झाली. आम्ही त्या बिछान्याजवळ गेलों व त्याची नीट तपासणी केली. हा बिछाना उगीच लहानसा असून गड्याबि-ड्याचा असावा असें दिसलें. तेथें एक खुंटी होती ती-वर एक लहानसा रुमाल होता. तो मध्यें थोडासा फाटलेला असून कोणी तरी शिवतां शिवतां तशीच सुई त्यास खोऊन ठेवून दिलेली होती. त्यावर कितीतरी धूळ बसलेली होती. हा रुमाल बहुतकरून जी म्हातारी नुकतीच तेथें मेली तिचा असावा व तो बिछानाही तिचाच असावा असें वाटलें. तेथेंच एक फडताळ होतें. तें फडताळ उघ-डून पहाण्याची मला इच्छा झाली व मीं उघडलेंही. त्यांत पुष्कळ सटरफटर वस्तू पडल्या होत्या व एका कोपऱ्यांत फितीनें एका ठिकाणीं बांधलेले दोन लखोटे दिसले. मीं ते लखोटे उचलून आपल्या हातांत तर घेतले. त्या खोलींत

दुसरी कांहींही ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट दिसली नाहीं तेव्हां आम्ही बाहेर जाऊं लागलों. पहिला तो प्रकाशाचा कोळही दिसला नाहीं. परंतु आमच्या पुढेंच जमिनीवर टपटप अशीं पावलें वाजलीं. आम्ही दुसरे एक दोन माळे होते त्यांतूनही हिंडून आलों. तीं पावलें आमच्या पुढें पुढें टपटप वाजत चाललीं होतींच. तीं पत्रें माझ्या हातांत होतीं व तीं तशींच धरून मीं जिन्यावरून उतरूं लागलों तेव्हां मला असा भास झाला कीं, माझें मनगट कोणींतरी बळकट धरून तीं पत्रें काढण्याचा यत्न चालविला आहे तसें वाटतांच मीं तीं पत्रें जास्ती घट्ट धरलीं, तों तीं पत्रें घेऊं इच्छिणाराचा यत्न बंद पडला. आम्ही पुन्हां आमच्या बिछान्याच्या खोलींत आलों. तेथें आल्यावर माझी दृष्टि माझ्या कुत्र्याकडे गेली व माझ्या लक्षांत आलें कीं, आपण इतका वेळ हिंडलों, परंतु हा कांहीं आपल्या मागोमाग आला नाहीं. तो एका कोंपऱ्यांत जाऊन घुसघुसून घुसघुसून जणूं काय त्या भिंतींत शिरण्याचा प्रयत्न करीत होता व भेदरून जाऊन हुडहुडी भरल्याप्रमाणें त्याचें सर्वांग थरथर करीत होतें. माझ्या हातीं आलेलीं पत्रें मी केव्हां एकदां वाचीन असें मला झालें होतें. त्यामुळें मी तीं ताबडतोब वाचावयास लागलों. इतक्यांत माझ्या नौकरानें मी त्याला आणावयास सांगितलीं होतीं तीं हत्यारें काढून माझ्या अंथरुणाच्या जवळ एका लहानशा तिपायी टेबलावर ठेविलीं व तीं ठेवल्यानंतर तो त्या कुत्र्याला चुचूकारून त्याची पाठ थोपटीत बसला. पण तो कुत्रा पहिल्याप्रमाणें भेदरलेलाच दिसत होता.

मला सांपडलेलीं पत्रें अगदीं लहान होतीं. त्यावर संवत् व तीथ हींही होतीं. बरोबर पस्तीस वर्षांच्या पूर्वींचीं तीं पत्रें होतीं व तीं एका तरुण अशा नवऱ्यानें आपल्या बायकोला किंवा कोणींतरी पुरुषानें आपल्या प्रेमपात्राला लिहिलेलीं होतीं. पत्रें गुजराथी असून अक्षर वेडेंवांकडें होतें. आंतील शब्दरचनाही तशीच होती व आधीं कोठें तरी दूर सफर केल्याचा संबंध त्यांत होता. त्यावरून लिहिणारा गृहस्थ विशेषसा शिकलेला नसून व्यापाराच्या निमित्तानें वारंवार समुद्रपर्यटण करणारा असावा असें दिसलें. पत्रांची भाषा फारशी सुंदर नव्हती; परंतु लिहिणाराचें अंतःकरण प्रेमानें अत्यंत भरलें असावें असें स्पष्ट दिसत होतें. मधून मधून एकदोन ठिकाणीं कांहीं तरी गुप्त गोष्टीला अनुलक्षून—आणि ही गोष्ट बहुतकरून कसल्या तरी कृष्णकारस्थानाची असावी—शब्द होते. त्यांतलीं एकदोन वाक्यें मला आठवतात तीं मी मराठींत देतों. "आपण एकमेकांवर प्रेम दाखविलें पाहिजे. कारण जर सगळें कांहीं बाहेर आलें तर जो तो आपला किती बरें तिटकारा करील" हें एक वाक्य. आणखीहीं एक आठवतें. तें हें—"तूं ज्या खोलींत निजत असशील त्या खोलींत दुसऱ्या कोणास राहूं देत जाऊं नको. तुला झोंपेंत बरळण्याची संवय आहे." तिसरें एक वाक्य आठवतें. तें असें:—"जें होऊन गेलें तें आतां परत येत नाहीं. आणखी मी तुला खात्रीनें सांगतों कीं, मेलेलीं माणसें जीवंत झालीं तर गोष्ट निराळी. पण तसें होईपर्यंत कांहीं आपलें कृत्य उघडकीस येणें शक्य नाहीं." एका पत्राच्या शेवटीं दुस-

ऱ्याच कोणाच्या तरी अक्षरानें पुढील वाक्य लिहिलेलें होतें.
" ....जेव्हां झालें त्याच दिवशीं आगबोटींत बुडून वारले."

मी तीं पत्रें खालीं ठेवून त्यांतील मजकुरावर स्वस्थपणें विचार करीत बसलों. इतक्यांत मला असें वाटलें कीं, या संबंधांत आपण विचार करीत बसल्यास न जाणों कदाचित् भलतेच विचार मनांत येऊन घाबरल्यासारखें होईल. तेव्हां आपण आपल्या मनाची स्थिति तशी न होऊं देतां जों जों अधिक अधिक रात्र होईल तों तों जे जे विलक्षण चमत्कार नजरेस पडतील ते ते पाहण्यासाठीं आपलें मन धीट करून ठेविलें पाहिजे. म्हणून मी ते विचार सोडून मेणबत्तीच्या दिव्याची काजळी वगैरे छान झाडून बरोबर नेलेलें पुस्तक उघडून वाचनांत मग्न होऊन गेलों. याप्रमाणें सुमारें साडे अकरा वाजेपर्यंत मी वाचीत बसलों. नंतर अंगांतला पोशाख वगैरे न काढितां तसाच अंथरुणावर जाऊन पडलों व दिवा उशाशीं ठेवून गड्यास, 'तूंही आतां जाऊन पड जा,' असें सांगून इतकें बजावलें कीं, (झोंप घेऊं नको, जागा ऐस). माझ्या खोलींतून त्याच्या खोलींत जाण्याचें जें दार होतें तें उघडें ठेवण्यास त्यास सांगितलें व हत्यारांच्या शेजारींच मी आपलें घड्याळ ठेवून स्वस्थपणें पुनः वाचूं लागलों. माझा कुत्रा बिछान्याचे जवळच झोंपीं गेल्याप्रमाणें स्वस्थ पडला होता. अशा स्थितींत सुमारें वीस मिनिटें गेलीं तों एकाएकीं एक अतिशय गार अशी वाऱ्याची झुळूक माझ्या गालावरून गेली असा मला भास झाला. मला वाटलें कीं, माझ्या उजवे बाजूस बाहेर जाण्याचें जें दार होतें, तें बहुतकरून उघडें राहिलें

असावें. परंतु पहातों तों तें दार जशाचें तसेंच लावलेलें दिसलें आणि सपाटून वारा लागल्याप्रमाणें मेणबत्तीची ज्योत हालत होती. इतक्यांत इकडे हत्यारांच्या जवळ ठेवलेलें माझें घड्याळ त्या तिपायीवरून हळू हळू सरकूं लागलें. किती हळू पण फारच! आणि तें सरकवणारें कोण हें तर कांहीं दिसेना! मनुष्याचा हात कीं कांहीं कीं कांहीं मुळींही कांहीं दिसत नव्हतें. इतक्यांत घड्याळ आजिबात नाहींसें झालें, त्याबरोबर मी सपाट्यानें उठलों. एका हातांत आपलें पिस्तूल व दुसऱ्या हातात जंबिया घेतला. घड्याळाप्रमाणेंच आपल्या हत्यारांचीही गच्छंति व्हावी असें मला वाटलें नाहीं. तेव्हां हत्यारें जवळ घेतलीं. मी हत्यारबंद होऊनच चहूंकडे पाहूं लागलों. घड्याळाचा मुळींच पत्ता नाहीं. तितक्यांत माझ्या उशाच्या बाजूस कोणीतरी ठक्ठक्ठक् असा खूप जोरानें आवाज केला. आमच्या जवानसिंगानें लागलीच, "आपणच काय, रावसाहेब?" असा प्रश्न केला. मीही त्याला "नाहीं. पण तूं अगदीं सावध रहा" असें सांगितलें. इकडे आमचा कुत्रा आतां जरा झोंप जाऊन आपल्या मागच्या दोन पायांवर बसून कान वगैरे उभारून कावराबावरा होऊन पाहूं लागला; व कांहीं वेळानें आपले डोळे असे कांहीं चमत्कारिक करून माझ्याकडे टवकारून पाहूं लागला कीं, मला वाटलें त्यानें आपलें सगळें—सगळें लक्ष्य मजकडे लाविलें असावें. नंतर तो हळूच उठला. त्याच्या अंगावरील सगळे केंस थरारून उभे राहिले होते. तो अतिशय उग्र दिसत असून ताठल्याप्रमाणें झाला होता व मुद्रा पहिल्याप्रमाणेंच क्रूर व कावरीबावरी होती; परंतु त्या

कुत्र्याची स्थिति पहात बसण्याला मला वेळ नव्हता. एकाएकीं माझा नौकर आपल्या खोलींतून बाहेर आला. भीति आणि घाबरणें म्हणजे काय तें मूर्तिमंत त्यावेळीं माझ्या नजरेस पडलें. तो घाबरल्यानें त्याचा चेहरा इतका बदलला होता कीं, रस्त्यांत जर मला तो त्या स्थितींत कधीं भेटला असता, तर मीं खरोखर त्यास ओळखलें नसतें. तो माझ्या जवळून झटकन् पळाला व जातां जातां माझ्या कानीं "धांवा, तें माझ्या पाठीमागें लागलें आहे" असें घाबऱ्या घाबऱ्या व अत्यंत हलके उच्चारलेले शब्द पडले. तो खोलीच्या दारापाशीं गेला. त्यानें झपाट्यानें दार उघडलें व झट्कन जिना उतरून पार गेला. मी त्याच्या मागोमाग "अरे दम धर, पळूं नको, धावूं नको." असें म्हणत म्हणत गेलों, परंतु त्याचें तिकडे अणुमात्र लक्ष्य गेलेंसें दिसलें नाहीं. तो एकदम पुढल्या दारापाशीं जाऊन तेथून पार तडक बाहेर चालता झाला, हें मीं प्रत्यक्ष पाहिलें. एकेका उडीस त्यानें किती पायऱ्या ओलांडल्या व तो दाराबाहेर किती थोड्या अवकाशांत गेला याची कल्पना एकट्या माझ्या खेरीज कोणाला येणें शक्य नाहीं आणि ती वर्णन करून सांगणेंही मला शक्य नाहीं. मी त्या जिन्याच्या चार पायऱ्या उतरून खालीं जातों न जातों तों रस्त्यावरलें दार धाडकन् उघडतांना व ताडकन् लागतांना असे दोन्हीही आवाज एकदम माझ्या कानीं येऊन पडले. त्या भूताटकीच्या घरांत आतां मी एकटाच राहिलों.

एका क्षणाचा विचार! माझ्या मनांत आमच्या जवानसिंगाचें अनुकरण करण्याचें वाटूं लागलें. परंतु अभिमान व औत्सुक्य

यांनीं शेवटीं आपली सरशी केली. भागुबाईप्रमाणें पळून जावें हें अगदीं अयोग्य असें वाटून लागलींच आपल्या खोलींत परत आलों. दार घट्ट लाविलें व जवान येवढा भ्याला तरी कशाला हें पहाण्यासाठीं आंतल्या खोलींत गेलों. जवानाला कां व कसलें भय वाटावें हें मला कांहींच कळेना. तेथें तर कांहींसुद्धां दिसलें नाहीं. न जाणों भिंतींत एखादें चोरदार वगैरे असेल आणि तेथून कोणी येऊन त्यास भिवविलें असेल असें मनांत येऊन मी सर्व भिंती नीटपणें तपासून पाहूं लागलों; परंतु कोठेंही तसा प्रकार दिसला नाहीं. फार तर काय भिंतीला कोठें चीर कीं फट सुद्धां नजरेस आली नाहीं. तर मग ज्या कशानें जवान भ्याला तें माझ्या खोलींत आधीं आल्यावांचून त्याच्या खोलींत गेलें कसें आणि होतें तरी काय? कांहींही समजेना!

मी आपल्या खोलींत परत आलों व जवानच्या खोलीचें दार घट्ट लावून घेऊन त्याला दिसलें तें आतां आपल्यालाही दिसेल अशी मोठी आशा धरून तें पहाण्यास व वेळ पडल्यास त्याच्याशीं टक्करही देण्यास अगदीं जय्यत तयारी करून उभा राहिलों. इतक्यांत मला असें दिसलें कीं, आपला कुत्रा पूर्वीप्रमाणेंच एका कोंपऱ्यांत जाऊन आपलें अंग त्या कोंपऱ्यांत चीण् चीण् चिणतो आहे. जणूं काय आपलें सगळें अंग त्या कोंपऱ्यांत गेलें तर घालावें असें त्यास वाटत होतें. मी त्याच्याजवळ गेलों व ममतेनें बोलूं लागलों; परंतु तो भीतीनें अगदीं गर्भगळित होऊन गेला आहे असें अगदीं स्पष्ट दिसत होतें. त्यानें आपले दांत बाहेर काढले होते व त्याच्या तोंडांतून लाळ गळत होती. मी

जर त्यास त्यावेळीं हात काविला असता, तर खात्रीनेंच तो मला डसला असता. त्यानें मला ओळखलें सुद्धां नाहीं असें दिसलें. एखाद्या सापासमोर सशाची स्थिति व्हावी तशी त्या कुत्र्याची स्थिति झाली होती. त्या प्राण्यास पूर्वस्थितीवर आणणें आतां आपल्यास शक्य नाहीं असें माझ्या मनाला पक्कें वाटून व न जाणों तो कदाचित् पिसाळला असेल असें मनांत येऊन मीं त्यास निमूटपणें जेथल्या तेथें राहूं देण्याचा विचार केला. आपल्या बिछान्याजवळ गेलों. त्या तिपा-यीवर पूर्ववत् आपलीं हत्यारें ठेविलीं आणि पुनः अंथरुणा-वर पडून आपलें पुस्तक वाचूं लागलों.

[library stamp]

प्रकरण ३ रें.

या ठिकाणीं मीं आपल्या स्वतःच्या मनासंबंधानें चार गोष्टी सांगण्यांत थोडीशी जागा अडविल्यास वाचक मला क्षमा करितील अशी आशा आहे. कारण त्या सांगितल्यानें आतांपर्यंत आपल्या अंगीं धैर्य व शांतता हीं कशीं राहिलीं याचें थोडेंसें स्पष्टीकरण होणार आहे.

माझी समजूत अशी आहे कीं, प्रसंगावधान किंवा धैर्य, हा गुण—ज्यास मी धैर्य असें म्हणतों, तो गुण—अंगावर पडणाऱ्या प्रसंगांचें जितकें अधिक ज्ञान असेल तितका मनुष्याच्या अंगीं अधिक असतो. व ज्या गोष्टींस आपण अत्यंत आश्चर्यकारक किंवा अजब असें समजतों, त्या गोष्टींविषयीं अनुभव व प्रयोग हीं मीं अनेकवार पाहिलीं असल्यामुळें मला त्यांविषयीं तितकें कांहीं न वाटल्यास कोणासही विशेष आश्चर्य वाटण्यास नको. या पृथ्वीच्या पाठीवर निरनिराळ्या देशांत पुष्कळ काळपर्यंत प्रवास केल्यानें व जेथें तेथें कांहीं अजब चमत्काराची गोष्ट असल्यास ती आदरून पहाण्याचा प्रसंग कधींही वायां जाऊं न दिल्यानें, माझ्या पाहण्यांत असे कांहीं विलक्षण प्रकार आले आहेत कीं, त्यांपैकीं कांहीं येथें सांगितल्यास कोणास खरे सुद्धां वाटणार नाहींत. आतां यासंबंधानें माझी व्युत्पत्ति अशी आहे कीं, दैविक किंवा अतिमानुष गोष्टी म्हणजे ज्या गोष्टींचें ज्ञान अद्यापि आपणास झालें नाहीं त्याच होत. सृष्टीच्या कित्येक नियमांचें ज्ञान अद्यापि आपणास झालेलें नाहीं आणि त्या अज्ञात नियमांच्या अनुसारें ज्या कित्येक

गोष्टी घडतात त्यांस आपण दैविक किंवा अतिमानुष म्हणतों. माझा आग्रह असा आहे कीं, आपल्यासमोर एकादें पिशाच उभें राहिलें तर "दैविक किंवा पैशाचिक चमत्कार शक्य आहेत" असें न म्हणतां 'पिशाच दिसणें हाही एक सृष्टिनियमांच्या अनुसारेंच होणारा चमत्कार आहे' असें म्हटलें पाहिजे.

आतां आजपर्यंत मीं ज्या ज्या गोष्टी पाहिल्या आहेत, व गूढगोष्टींचा तलास लावणाऱ्या शोकी लोकांनीं ज्या ज्या गोष्टी खरोखर घडल्या म्हणून नमूद केल्या आहेत, त्या त्या गोष्टींच्या पलीकडे कोणी तरी सजीव असा कर्ता असतो. अद्यापिही आपण भुतें उतन्न करितों असा बाणा वाळगणारे लोक आपल्या या हिंदुस्थानांत व युरोपांत वगैरेही आहेत. आपण एक क्षणभर असें धरून चालूं या कीं, ते म्हणतात त्याप्रमाणें त्यांचे हातून कृति होते. तरी पण असें जरी धरलें तरी काय झालें? ज्यास आपण पिशाच असें म्हणणार, तें तयार करून आपल्या डोळ्यांपुढें आणणारा असा सजीव मनुष्य आपल्यापुढें उभा असतोच. आपल्या इंद्रियांस कांहीं तरी भास करून देण्यास त्याच्या कर्तृत्वशक्तीची जरूर लागते. त्याचप्रमाणें अनेक प्रांतांतून भूतचेष्टेच्या म्हणून ज्या गोष्टी ऐकण्यांत येतात कोठें अत्यंत सुंदर गायन ऐकूं येतें, कोठें अकाळ विकाळ आरोळया ऐकूं येतात, कोठें कोणाच्या अंगांत आलेलें ऐकूं येतें, कोठें हात न दिसतां कागदावर कांहीं अक्षरें लिहिलेलीं दिसतात, कोठें इकडचें सामान आपोआप तिकडे उठून गेलेसें दिसतें; या सर्व गोष्टी घडण्यास कांहींना कांहीं तरी

त्यांच्या पाठीमागें मानवी शक्ति असलीच पाहिजे, असें आपणास तर दिसतें. त्याखेरीज असल्या गोष्टी घडणें संभवनीय नाहीं. ज्यास हल्लीं मेस्मेरिझम असें म्हणतात तो चमत्कारही यांपैकींच होय. ज्या मनुष्यावर मेस्मेरिझमचे प्रयोग होतात तो मनुष्य दुसऱ्या कोणातरी मनुष्याच्या इच्छेच्या आधीन झाल्याकारणानें त्याचे हातून प्रयोग करणाराच्या इच्छेप्रमाणें कामें होतात. यदाकदाचित् हेंही जरी खरें धरलें कीं, शंभर मैलांवरूनही एका मनुष्यास दुसरे मनुष्यावर मेस्मेरिझमचा प्रयोग करितां येतो तरी त्यांत काय झालें? ज्याप्रमाणें विद्युत् त्याप्रमाणेंच विद्युन्मानसशक्तीही पुष्कळ अंतरावर असणाऱ्या पदार्थांवर आपली शक्ति चालवूं शकणारच, असा एक माझा पक्का ग्रह झाल्याकारणानें मला कोणचीही गोष्ट अमानुष किंवा दैविक असें वाटून तीविषयीं मनाला विशेष कांहीं वाटत नसे. अर्थातच कोणचीही चमत्कारिक गोष्ट पाहिली म्हणजे तिचे पाठीमागें पडद्यांत असणारी मानवीशक्ति कोणची हें शोधून काढण्याकडे माझें लक्ष्य विशेष जाऊन, समोर घडणाऱ्या चमत्कारांसंबंधानें भीति फार थोडी वाटत असे. किंबहुना मुळींच वाटत नसे. अर्थातच या रात्रींही जे जे चमत्कार मीं पाहिले ते ते सर्व मला, त्यांच्या पाठीमागें मानवीशक्ति कोणची आहे हें शोधून काढण्यासाठीं अधिकाधिकच उत्सुक करूं लागले.

माझा तर्क असा होता कीं, आज ज्या ज्या गोष्टी माझ्या इंद्रियांच्या अनुभवास आल्या त्या त्या सर्व तसल्या शक्तीनें युक्त अशा माणसांच्याच हातून होत असाव्या व या सर्व

गोष्टी करून दाखविण्यांत त्यांचा कांहीं हेतुही असावा. असें असल्यामुळें माझें मन भीतीपेक्षां त्या तर्काच्या सत्यासत्यतेविषयींच्या विचारानेंच अधिक व्यापलें होतें. माझे सर्व विचार भोळवटपणाचे नसून तात्त्विक दृष्टीकडे लागलेले होते, आणि जसा एखादा रसायनशास्त्री, एखादां नवीन रसायनप्रयोग करून त्यापासून काय परिणाम होतात हें पाहण्यासाठीं शांतपणें बसतो, तसा मीही पुढें काय होतें तें पाहण्यासाठीं मन अगदीं शांत करून आपल्या पुस्तकांत गढून जाण्याचा यत्न करीत होतों. कां कीं, रिकामें मन असलें म्हणजे कल्पनेला जागा होऊन त्यांत भलभलते विचार शिरतात. परंतु मन व्यापृत ठेविलें असलें म्हणजे भीतिप्रद वगैरे विचार मनांत शिरणें साहजिक नसतें.

वाचतां वाचतां एकाएकीं मी वाचीत होतों त्या पानाच्या व प्रकाशाच्या मध्यें कांहीं तरी आलें आहे असा मला भास झाला. माझ्या पानावर छाया पडली. मीं डोळे वर केले, आणि पाहिलें तों ज्याचें बरोबर वर्णन करणें अगदीं अशक्य, निदान अत्यंत कठिण, असें कांहीं तें होतें.

हवेमध्यें अंधकाराचा एक समूह जणूंकाय एकवटत एकवटत जाऊन त्याची एक चमत्कारिक आकृति बनत चालली होती. त्याला मनुष्याचेंच रूप येत होतें, असें माझ्याच्यानें सांगवत नाहीं; परंतु मनुष्याच्या आकृतीशीं किंवा मनुष्याच्या सावलीच्या आकृतीशीं त्या आकृतीचें फार साम्य होतें. सभोंवतालचा अंधार (किंबहुना प्रकाश म्हटल्यास विशेष चांगलें होईल, कां कीं ती आकृति सभोंवतालच्या अंधाराच्या मानानें फारच काळी होती) त्या आकृतीच्या अंधाराहून

अत्यंत भिन्न होता. होतां होतां ती आकृति मोठी होत चालली, तिचें शिखर वरच्या कडीपाटास लागलें व मी तिजकडे न्याहाळून पहात असतां, एकाएकीं मला थंडी वाजल्याप्रमाणें माझ्या अंगावर कांटा उभा राहिला. माझ्यासमोर बर्फाचा एक मोठा थोरला डोंगर कोणीं उभा केला असता तरी सुद्धां मला इतकी थंडी वाजली नसती. ही थंडी वाजली व कांटा उभा राहिला तें भीतीनें खास नव्हे. कारण इतकी हुडहुडी भरली असतांही मी अगदीं डोळे वटारून त्या आकृतीकडे एकसारखा पहात होतों. खात्रीनें मात्र सांगतां येत नाहीं, परंतु त्या आकृतीच्या वरच्या टोंकापासून दोन डोळे आपणाकडे एकसारखे पहात आहेत असेंही मला वाटलें. एकाक्षणीं ते डोळे आपणाकडे पहात आहेत असें वाटावें, आणि दुसऱ्याक्षणीं अगदीं नाहींसे व्हावे, ह्याप्रमाणेंच चाललें होतें. एवढें मात्र खरें कीं, ज्या ठिकाणीं मला दोन डोळे असावे असें वाटत होतें त्या ठिकाणापासून दोन निळसर रंगाचे तेजःकिरण निघून मजकडे येत होते.

कांहीं तरी बोलावें म्हणून मीं पुष्कळ यत्न केला, परंतु तोंडावाटे एक अक्षरही उमटेना. मी आपल्या मनाशींच आपल्याला भय वाटूं लागलें आहे कीं काय असा प्रश्न करून 'छे! भय कसचें आलें आहे?' असें उत्तरही त्यास दिलें. मीं उठण्याची बरीच खटपट केली, परंतु तीही व्यर्थ! कांहीं तरी जबरदस्त अशा जोरानें आपणास कोणी दाबून धरीत आहे असें मला वाटलें. खरोखर माझा असा पक्का समज झाला कीं, आपल्या इच्छाशक्तीच्या

विरुद्ध कोणा तरी दुसऱ्याची जबरदस्त शक्ति आपणावर प्रभाव चालवीत आहे. एखादा मनुष्य अरण्यांत हिंडत असतांना भयंकर व्याघ्राच्या सपाट्यांत यावा, किंवा समुद्रावर वादळाच्या सपाट्यांत सांपडावा, किंवा आगींत सांपडावा, किंवा एखाद्या मगरीच्या तडाक्यांत सांपडावा आणि जशी त्याची स्थिति होते, त्याला त्याची दुर्बलता जशी विशेष भासूं लागते, तशीच माझी यावेळीं स्थिति झाली. माझें मन अगदीं दुर्बल असें झालें. माझ्या इच्छाशक्तीच्या विरुद्ध जी इच्छाशक्ति असावी, ती अत्यंत प्रबल असावी यांत संशय नाहीं. मनुष्याचें शरीरबल वादळ, आग, वाघ व मगर इत्यादिकांच्या बलापेक्षां जितकें कमी, तितकेंच माझें मनोबल कमी, असें मला वाटूं लागलें.

आणि ही स्थिति माझ्या मनांत जों जों विशेष येऊं लागली, तों तों मात्र मी विशेष घाबरत जाऊन शेवटीं चांगलाच घाबरलों. इतका घाबरलों कीं, त्याचें वर्णन करून सांगणें शक्य नाहीं. परंतु 'सुंभ जळाला तरी पीळ जळत नाहीं' या म्हणीप्रमाणेंच आमची स्थिति झाली म्हणावयाची. आम्ही अतिशय घाबरलों, तरी आमची गुर्मी कांहीं कमी झाली नाहीं. आमचा अभिमान जसाच्या तसाच जागृत होता. धैर्य जरी गळालें तरी मी आपल्या मनाची अशी समजूत करूं लागलों कीं, मी घाबरलों आहे खरा, पण अजून भेदरलों नाहीं ! भेदरलों कीं मग मात्र घडगत नाहीं भेदरून जाईपर्यंत मला कांहींही उपद्रव पोंचणार नाहीं. माझी विचारशक्ति

मला सांगते कीं, दिसताहेत या गोष्टी खऱ्या नाहींत. हा सर्व भास आहे. मी याला मुळींच भीत नाहीं. इतकें आत्मसमाधान केल्यावर मला थोडासा धीर आला व एकदां आपकें होतें नव्हतें तें बळ खर्च करून मी आपला हात तर, हत्यारें ठेविलीं होतीं त्या बाजूस कांब केला; परंतु त्यावेळीं माझ्या हातावर व खांद्यावर कोणी तरी इतक्या जोरानें तडाका हांटल्याचा मला भास झाला कीं, माझा हात एकदम गळून पडल्याप्रमाणेंच झालें. मी अगदीं निर्बल होऊन पडलों. त्यांतही आणखी भयंकर गोष्ट ही झाली कीं, मेणबत्तीचा प्रकाश अगदीं मंद-मंद होत चालला. वरून कोणी मेणबत्ती विझवीत होतें असें नाहीं, तर जणूं काय त्या मेणबत्तीची वात खालून कोणी तरी हळू हळू आंत ओढीत होतें. क्षणार्धांत त्या खोलीभर जिकडे तिकडे गाढ अंधकार झाला. आणि आतां या अंधकारानें भरलेल्या खोलींत आपण एकटेच असून ती अंधारांत जास्त अंधारी दिसणारी आकृति—जिच्या शक्तीमुळें आपण इतके निर्बल झालों, तीच कोठें तरी आपल्या सन्निध आहे असें मनांत येण्याबरोबर आमच्या घाबरण्याची अगदीं परमावधी झाली; परंतु सर्व गोष्टीस मर्यादा ही आहेच. कोणत्याही गोष्टीचें अति झालें म्हणजे त्याचा परिणाम अगदीं उकट प्रकारचा होत असतो. सध्यांच्या प्रसंगीं माझें घाबरणें इतक्या स्थितीस जाऊन पोंहचलें होतें कीं, आतां दोनच गोष्टी शक्य होत्या. एक आम्ही त्या स्थितींत बेशुद्ध होऊन पडून गच्छंति तरी व्हावयाची, किंवा आम्हांला जब-

4

रदस्त धैर्य येऊन आम्ही कांहीं तरी विशेष पराक्रम तरी करूं लागावयाचे. शेवटीं माझ्या नशिबानें दुसरीच अवस्था झाली. मी सपाट्यानें उठलों आणि एकदम एक किंकाळी फोडली. नंतर आपल्याशींच खूप मोठ्यानें "मी मुळींच भीत नाहीं. माझें मन मुळींच कचरलें नाहीं" असें ओरडलों. माझ्या अंगात खूप बळ आलेंसें वाटलें. उठल्याबरोबर तडाक्यानें खिडकीपाशीं गेलों आणि ताडकन् खिडकीचीं दारें उघडून टाकिलीं. प्रकाश पाहिजे. हें काय तें एकसारखें माझ्या मनास वाटत होतें. आणि खिडकी उघडण्याबरोबर जेव्हां आकाशांत स्वच्छ चांदणें पडलेलें पाहिलें व चंद्राचा तो शांत व शीत प्रकाश खिडकींतून एकदम आंत घुसला, तेव्हां मला अतिशय आनंद झाला. आपल्या घाबरण्याचें चांगलें चीज झालें असें वाटूं लागलें. कारण कीं, मी इतका घाबरलों नसतों तर खरोखरच माझ्या अंगीं इतकें धैर्यही आलें नसतें. चंद्राचा प्रकाशही आला व त्या गल्लींत एक म्युनिसिपालिटीचा दिवा होता त्याचा प्रकाशही थोडासा दिसला. खिडकीच्या बाहेर क्षणभर पाहून मी पुन्हां भीत भीत आंत पाहूं लागलों. तों ज्या अंधकाराकृतीनें मला इतकें घाबरविलें होतें, ती मुळींच दिसेनाशी झाली. फक्त समोरच्या भिंतीवर एक लहानशी काळी पडच्छाया दिसत होती. ती पडच्छाया त्या अंधाऱ्या आकृतिचीच असावी.

माझे डोळे आतां माझ्या त्या टेबलाकडे गेले. त्या टेबलावर सरपोस वगैरे कांहींएक नव्हतें. तें अगदीं उघडें होतें. मी पहातां पहातां खालून एक हाताचा पंजा हल-

केंच वर येतांना दिसला. हा हात चांगला तुमच्या आम-च्याप्रमाणें हाडा मांसाचा व कातड्याचाच होता. मात्र कोणा तरी म्हातान्या माणसाचा असून अगदीं कृश, चिर-मिळ्या पडलेला व लहानसा असा होता. तो हात वर येतां येतां अगदीं टेबलावर आला व एकदम त्या ठिकाणीं मीं जीं दोन पत्रांची पुडकीं ठेविलीं होतीं, त्यावर झडप घातल्याप्रमाणें करून तीं पत्रें गच्च धरिलीं आणि पुन्हां जसा तो हात दिसूं लागला होता तसाच तो दिसेनासा झाला.

पत्रें नाहींशीं होतांच ज्याप्रमाणें पूर्वी माझ्या पलंगाच्या उशाशीं कोणी तीन वेळां ठक् ठक् ठक् असें केलें होतें त्याप्रमाणें आतांही आवाज झाला. तो आवाज ऐकूं येईनासा होतो तोंच सर्व खोली एकदम थरथरल्यासारखी झाली व माझ्यापासून अगदीं समोर दुसऱ्या टोंकास कोंपऱ्यांत एकाएकी बारीक बारीक ठिणग्या किंवा गोळ्या किंवा प्रकाशाचे बुडबुडे म्हटले तरी चालेल—निघूं लागले. ते नानाप्रकारच्या रंगाचे होते. तांबडे, हिरवे, पिंवळे, अस्मानी असे होते. ते खालीं वर इकडे तिकडे अति-शय लहान अशा दिव्यांप्रमाणें नाचूं लागले. त्यांत कांहीं जलद नाचत होते व कांहीं सावकाश नाचत होते. एकंदरींत जणूं काय ज्याला जसें वाटेल तसें त्याचें नाचणें चाललें होतें. इतक्यांत खालच्या एका खोलींत घडल्या-प्रमाणें येथेंही एक खुर्ची तरा तरा चालत येऊन टेबलाच्या जवळ थडकली व तिच्या शेजारीं उभी राहिलेली एक आकृति दिसूं लागली. ही आकृति एका स्त्रीची होती. चेहरा अगदीं तरुण दिसत होता. परंतु त्याच्यावर चांगलीच प्रेतकळा होती


व तो चेहरा अत्यंत सुरूप असावा असें स्पष्ट दिसत होतें. त्या आकृतीचें सर्वांग गुजराथी पेहरावाप्रमाणें नेसलेल्या लुगड्यानें किंवा पातळानें म्हणा झांकलेलें होतें. फक्त पदर डोक्यावरून घेतलेला नसून सगळे केश मोकळे असून ते पाठीवर सडक लांब असे पडलेले होते. तिचे डोळे मजकडे नव्हते. ते एकसारखे दाराकडे लागलेले दिसले. ती अतिशय उत्सुकतेनें कोणाची तरी वाट पहात आहे, कशाचा तरी कानोसा घेत आहे असें दिसलें. माझ्या समोरच्या भिंतीवर जी पूर्वींच्या छायाकृतीची सावली पडली होती ती आतां मोठी होत चालली. आणि पुन्हां मला असें वाटलें, कीं त्या छायाकृतीच्या शिखरापासून दोन अतिशय तेजस्वी डोळे त्या स्त्रीच्या आकृतीकडे एकसारखे लागले आहेत.

दार तर उघडलें नाहीं; परंतु जणूं काय तें दार उघडूनच आंत आल्याप्रमाणें एक आकृति स्पष्ट दिसूं लागली. ही आकृति—एका पुरुषाची—तरुण पुरुषाची होती. तिचा पोषाख गुजराथी तऱ्हेचाच परंतु चाळीस पन्नास वर्षांपूर्वीं जसा गुजराथी लोक करीत असत तसा होता. किंवा तशा सारखा दिसत होता असें म्हटलें तरी चालेल. कारण त्या आकृति अर्थात् त्याचप्रमाणें त्यांचा पोषाखही केवळ भासच होते. त्या दोन्ही आकृतींचे पोषाखही चांगले उंची असून ते आंगावर घालणाऱ्या प्रेतासमान आकृतींशीं त्यांचा फार विलक्षण विरोध दिसत होता. ती पुरुषाकृति हळूहळूच जाऊन त्या स्त्रीच्याजवळ खुर्चीवर बसली. आणि ती पाठीमागली अंधकारमय छायाकृति

३१११०

एकदम भिंतीपासून निघून त्या स्त्रीपुरुषांकडे येऊं लागली. क्षणार्धांत तीं तिघेंही अत्यंत गाढ अंधकारांत दिसेनाशीं झालीं; परंतु ही स्थिति फार वेळ टिकली नाहीं. थोड्याच वेळांत किंचित् किंचित् प्रकाश पडूं लागून त्या तीनही आकृति पुन्हा दिसूं लागल्या. ती छायारूप आकृति मध्यें उभी असून एकीकडे ती स्त्री व एकीकडे तो पुरुष, त्या स्त्रीच्या उर:प्रदेशावर मोठा थोरला रक्ताचा डाग व तो पुरुष तलवारीवर भार देऊन उभा आहे असा देखावा दिसला. एक-सारखें रक्त गळतच होतें. होतां होतां त्या छायाकृतीची कृष्णछाया पसरत जाऊन त्या दोघांही स्त्रीपुरुषाकृतीस तिनें ग्रासून टाकिलें. त्या आकृति अगदीं दिसेनाशा झाल्या आणि पुन: ते मघाचे प्रकाशाचे फुगे उत्पन्न होऊन मघांप्रमाणेंच परंतु आतां जास्त जोरानें व असंख्य असे नाचूं लागले.

नंतर त्या गडच्याच्या खोलींतून दार उघडून एक म्हातारी बाहेर आली. तिच्या हातामध्यें पत्रें होतीं. त्या चिरमिळ्या पडलेल्या पंजानें माझ्या टेबलावरून हिसकाऊन नेलीं तींच तीं पत्रें होतीं.



प्रकरण ४ थें.

तिच्या पाठोपाठ कांहीं पावलेंही वाजलीं. तिनें वळून मागें पाहिलें. कशाचा तरी कानोसा घेतल्याप्रमाणें ती करीत होती. नंतर तीं पत्रें तिनें उघडलीं व वाचूं लागली. तिच्यामागून खांद्यावरून त्या पत्रांकडे पाहणारा असा एक चेहरा दिसला. हा चेहरा अत्यंत फिकट, प्रेतवत् दिसत होता. जसा एखाद्या पाण्यांत बुडून फुगून वर आलेल्या माणसाचा चेहरा दिसावा तसा तो चेहरा —ज्यांतून पाणी गळतें आहे अशा केंसांतून ल्व्हाळीं शेवाळीं अडकलीं आहेत, चेहऱ्यावर पांढुरकें पांढुरकें पीठ आलें आहे. असा दिसत होता. त्या म्हातारीच्या पायांजवळ एक स्त्रीचें प्रेत पडलें आहे आणि त्या प्रेताजवळ एक अतिशय अशक्त पोर दमून बसलें आहे असें दिसलें. या पोराच्या गालांवरून त्याची उपासमार अतोनात झाली आहे असें दिसत होतें आणि डोळ्यांवरून, तें अतिशय भेदरलें आहे असें दिसत होतें. इकडे मी त्या म्हातारीच्या चेहऱ्याकडे पुनः जों पाहतों, तों त्याच्यावरील म्हातारपणची कळा सगळी नाहींशी होऊन तो चेहरा अगदीं तरुणपणाप्रमाणें दिसूं लागला. डोळे मोठें कठोर दिसूं लागले. चेहरा मोठा मठ्ठ दिसत होता, परंतु अगदीं तरुणपणचा खचित. इतक्यांत ती छायाकृति पुनः उठली आणि पुढें येऊन तिनें त्या तीनही आकृतींस आपल्या छायेनें झांकिलें.

थोड्याच वेळांत त्या छायाकृतीखेरीज कांहींसुद्धां जागीं

राहिलें नाहीं आणि माझे डोळे अत्यंत उत्कंठेनें त्या छायाकृतीकडे लागले. होतां होतां त्या आकृतीला डोळे दिसूं लागले. तेच ते पूर्वी दिसलेले भयंकर मत्सरपूर्ण सापासारखे डोळे. ते तेजाचे फुगेही पूर्वीप्रमाणेंच उत्पन्न होऊन वर खालीं, इकडे तिकडे नाचूं लागले. पहिल्याप्रमाणेंच त्यांचें तें भयंकर तांडव चालूं होतें व त्यांत आणखी तो फिकट असा चंद्रप्रकाश मिसळल्या कारणानें देखावा फारच चमत्कारिक दिसे. होतां होतां त्या तेजाचे फुगे फुटूं लागले व त्यांतून कांहीं भयंकर प्राणी बाहेर पडूं लागले. खोलींतली सर्व हवा त्या प्राण्यांनीं भरून गेली. ते प्राणी इतके रक्तहीन व इतके ओंगळ व इतके भयंकर दिसत होते कीं, त्यांचें वर्णन कशाही प्रकारें माझ्या हातून होणें नाहीं. अत्यंत जबर शक्तीच्या सूक्ष्मदर्शक यंत्राखालीं पाण्याचा एक बिंदु घालून त्यावर प्रकाश पाडून त्याचें निरीक्षण केलें असतां जसे त्यांत पारदर्शक, चपल, एकमेकांच्या पाठीस लागून एकमेकाला खाण्याखेरीज ज्यांना दुसरा कांहीं उद्योग नाहीं असे असंख्य प्राणी दिसतात, तसेच हे प्राणी होते. नुसत्या डोळ्यांनीं आजपर्यंत कधीं कोणीं पाहिलेले नसतील. हे प्राणी अमुकच आकाराचे होते असें सांगणें अगदीं अशक्य. त्यांस आकारच नव्हता म्हटलें तरी चालेल. आणि त्यांना आकार नव्हता त्याप्रमाणेंच त्यांच्या गतींनाही कांहीं व्यवस्था नव्हती. अद्वातद्वा सैरावैरा ते आपले धांवत होते. त्यांच्या त्या सैरावैरा धांवण्यांत तरी कांहीं मौज होती का म्हणतां? मुळींच नाहीं. ते माझ्या भोंवतालीं भोंव-

तालीं येऊं लागले. होतां होतां माझ्या डोक्याभोंवतीं त्यांची गर्दी अतोनात होऊं लागली. ते जलद जलद जवळजवळ येऊं लागले. कांहीं माझ्या उजव्या हातावर चढून इकडून तिकडे हिंडताहेत असा मला भास झाला. भुताटकीच्या दुष्ट परिणामाचा आपणास स्पर्शही होऊं नये, म्हणून मीं तो हात जणूं काय त्यांच्या निवारणा-र्थच वर केला होता. केव्हां केव्हां मला असा भास झाला कीं, मला कोणीं तरी स्पर्श केला. कोणी म्हणजे त्या प्राण्यांनीं नव्हे, तर कोणाच्या तरी अदृश्य हातांनीं. एकदां तर मला असें वाटलें कीं, अगदीं थंड-गार अशा बोटांनीं कोणी तरी आपला गळा सपाटून दाबून धरला आहे. अजूनपर्यंत मला आपलें पक्कें वाटत होतें कीं, आपण जरी थोडेसे भेदरलों तरी आपली त्रेधा उडून शरीरास कांहीं तरी इजा होईल. माझ्यापेक्षां अत्यंत प्रबळ अशी जी कोणाची इच्छाशक्ति मला आपल्या-प्रमाणें वांकवूं पाहत होती, त्या इच्छाशक्तीचा प्रभाव आपल्या मनावर जितका न होईल, तितकी खटपट करावयाची हा काय तो माझा मुख्य हेतु होता. या हेतूनें मी आपली दृष्टि त्या खोलींत सभोंवार फिरवूं लागलों. त्या छायाकृ-तीपासून आपली दृष्टि वळविली. विशेषतः ते डोळे—का-रण आतां ते डोळे अगदीं स्पष्टपणें दिसूं लागले होते—त्या सर्पाच्या डोळ्यांसारख्या भयंकर डोळ्यांकडून आपले नेत्र दूर करावे असें मनांत आणून मीं ते वळविलेच. कारण मला असें पक्कें वाटलें कीं, जी इच्छाशक्ति मला कांहीं तरी गोत्यांत आणण्याकरितां इतके प्रयत्न करीत आहे, ती खास

त्या डोळ्यांतच जणूं काय एकवटली असून मला जमीन-दोस्त करून टाकावें हाच तिचा उद्देश दिसतो.

चंद्राच्या पांढुरक्या तेजानें पांढुरकें झालेलें वातावरण आतां एकाएकीं तांबडें दिसूं लागलें. जणूं काय कोठें तरी आगच लागण्याचा सुमार आहे. ते कीटक तांबडे तांबडे दिसूं लागले, जणूं काय अग्नीच्या ज्वालांतच त्यांचें नित्याचें वसतिस्थान! पुनः एकदां ती खोली थरथरली. पुनः एकदां मागल्याप्रमाणेंच एक दोन तीन वेळां ठोठावल्याचा आवाज झाला आणि पुनः एकदां त्या छायाकृतीच्या कृष्णछायेंतच सर्व कांहीं कृष्ण झालें. जणूं काय सर्व कांहीं त्या काळोखापासूनच उपस्थित झालें असून आतां सर्व कांहीं त्यांतच मिसळून गेलें.

पुढें तो अंधार कमी कमी होत चालला, तसतशी ती छायाकृति दिसेनाशी झाली व शेवटीं तीही पार निघून गेली. ती छाया जात चालली तसतसा आमच्या मेणबत्तीचा प्रकाश दिसूं लागून अधिकाधिक होऊं लागला. होतां होतां मेणबत्तीची वात जणूं काय कोणीं आंत ओढली होती ती पूर्णपणें वर येऊन आतां सर्व खोली पूर्वीप्रमाणें स्वच्छ दिसूं लागली.

दोनही दारें अद्यापि जशींची तशींच घट्ट लागलेलीं होतीं. जेथें माझा नोकर निजला होता, त्या खोलीचें दार तर अद्यापि घट्ट लागलेलेंच होतें. ज्या एका कोपऱ्यांत तो माझा कुत्रा आपल्याला चीणू चीणूचिणून घेत होता, त्याच कोपऱ्यांत तो आतांही पडलेला दिसला. मी त्याला हांका मारिल्या पण त्याची मुळींच हालचाल दिसेना. मी त्याच्या-

जवळ जाऊन पाहतों तों काय? तो मरून पडलेला दिसला. त्याचे डोळे बाहेर आले होते. आणि जीभ तोंडाच्या बाहेर निघाली होती. त्याच्या तोंडाभोंवतीं दरदरून फेंस आलेला होता. मी त्याला उचलला. तो मेला नसेल अशा समजुतीनें त्याला ऊन वगैरे आणण्याचा यत्न केला, परंतु काय उपयोग? तो थंडगारचा थंडगारच! मला त्याच्या मरणानें अत्यंत दुःख झालें. त्याच्यावर माझें अत्यंत प्रेम होतें, आणि त्याची अशी स्थिति झाल्यावर मग काय विचारतां? त्यांत आणखी मला असें वाटूं लागलें कीं, आपल्या मूर्खपणामुळें त्याला असें मरण आलें आणि मी आपल्यालाच दोष देऊं लागलों. तो कुत्रा केवळ भीतीनेंच मेला असावा, तो भेदरल्याचीं चिन्हें दाखवूं लागला, तेव्हांच आपण त्याला दार उघडून जाऊं देणें वाजवी होतें. हें आपण केलें नाहीं, तेव्हां ती श्वानहत्या आपल्याच माथीं खास, असें वाटून मी अगदीं पश्चात्तापविव्हल झालों होतों. इतक्यांत काय आश्चर्य पहा! त्या कुत्र्याची मान कोणी तरी मुरगळून त्याला मारलें असावें असें मला स्पष्ट दिसून आलें. त्याच्या मानेचा कांटा अगदीं मोडून गेला होता. हें कोणा तरी मानवी हाताचेंच कृत्य खास, यांत शंका नाहीं असें मला वाटलें. इतका वेळ जे सर्व चमत्कार झाले, ते कोणा तरी माणसाच्या हातावांचून झाले नाहींत हें आपलें माझ्या मनानें पक्कें घेतलें. संशय घेण्याला जागा रगड होती, हें तर कोणीही कबूल करील. तरी मला कांहीं जास्त लिहितां येत नाहीं. ज्या गोष्टी खरोखर घडल्या त्या आपल्या मी

सांगतों इतकेंच! त्याच्यापासून जीं कांहीं अनुमानें काढा-वयाचीं तीं ज्याचीं त्यानें काढावीं.

आणखीही एक आश्चर्यकारक गोष्ट घडली. ती ही कीं, माझें घड्याळ इतक्या गूढ तऱ्हेनें जसें नेलें होतें तसेंच तें टेबलावर परत आलें. परंतु तें ज्या वेळीं तेथून नाहींसें झालें त्या वेळींच तें अजिबात बंद झालें होतें. आणि पुढें मुंबईमधील अत्यंत मोठमोठ्या घड्याळजींना दाखवून तें नीट करून आणिलें, तरी तें बरोबर चालेनासें झालें आहे. चार तास चाललें तर आठ दिवस बंद पडतें. आणि पुनः जर नीट करून आणून चालू केलें तर तासास दोन तास पुढें जाईल अगर मागें येईल अशी त्याची विलक्षण स्थिति झाली आहे. तें अगदीं कुचकामाचें झालें आहे येवढें खरें. त्या रात्रींत पुढें आणखी कांहींही घडलें नाहीं; आणि आतां उषःकाल होण्यासही फारसा वेळ नव्हता. परंतु चांगलें फटफटीत उजाडून सूर्यप्रकाश पडेपर्यंत मीं तें घर सोडलें नाहीं. मी तें घर सोडण्यापूर्वीं ज्या खोलींत मी व माझा नोकर कोंडून राहिलों होतों त्या अंधाऱ्या खोलींत पुनः एकदां गेलों. माझ्या मनाचा असा पक्का ग्रह झाला होता कीं,—कां तें मात्र कळत नाहीं—आतांपर्यंत जो भुताटकीचा आम्हीं प्रकार पाहिला त्या सर्वांचें उगमस्थान त्या खोलींत असावें! आणि आतां भर दिवसाच्या उजेडांत जरी मी त्या खोलींत उभा होतों, तरी सुद्धां माझ्या अंगावर रात्रीप्रमाणेंच भीतीनें शहारे उठले. त्या खोलीमध्यें माझ्यानें अर्ध्या मिनिटाच्यावर कांहीं राह-वलें नाहीं. मी जिना उतरूं लागलों, तेव्हां माझ्यापुढें

पहिल्याप्रमाणें पावलें वाजूं लागलीं. आणि रस्त्याचें दार उघडून मी बाहेर जातों, तों कोणी तरी फारच चमत्कारिक तऱ्हेनें हंसल्यासारखेंही माझ्या कानीं आलें. मी तडक आपल्या घरीं गेलों. माझा नौकर मला भेटेल, त्याची काय अवस्था आहे ती पहावी म्हणून मीं येवढी जलदी केली. परंतु त्याचा मुळींच पत्ता नव्हता, व पुढें आठ पंधरा दिवसांत त्याचा पत्ता लागला नाहीं. पंधरा वीस दिवसांनंतर उत्तर हिंदुस्थानांतून मला एक पत्र आलें. तें त्याच्याचकडून आलेलें होतें. त्यांत त्यानें असें लिहिलें होतें कीं, "सरकार, मी आपणास न विचारतां एकदम निघून आलों याबद्दल माफी असावी. मी त्या भयंकर घरांत जें कांहीं पाहिलें तें जर आपण पाहिलें असाल तर मला तेव्हांच केल्या अपराधाबद्दल क्षमा कराल. जें कांहीं त्या वेळीं मला दिसलें तें अद्यापि माझ्या पाठीस लागलें आहे. आतां माझ्या हातून नौकरी होणें अगदीं कठिण म्हणून मी तडक आपल्या घरीं निघून आलों. घरीं आलों आहें तरी दचकणें, थरथर कांपणें व आपल्या पाठीस लागलेलें तें अजून आहेच कीं नाहीं, हें पाहण्यासाठीं वारंवार मागें वळून वळून पाहणें याखेरीज दुसरें कांहींही मी करीत नाहीं. माझे चार कपडे वगैरे आपल्या तेथें राहिले आहेत ते व पैसे आपल्याकडे कायं येणें आहेत तेवढे या पत्त्यावर पाठविल्यास रिकाम्या बसलेल्या मला फार उपयोगी पडतील."

या भुताटकीच्या अंतर्भागीं कांहीं तरी मनुष्यकृति असावी असें मला वाटत होतें तें कायमच होतें. संध्याकाळीं एका व्हिक्टोरियेंत बसून माझ्या जिनसा मी त्या घरांत

टाकून आलों होतों त्या घेऊन येण्यासाठीं मी तिकडे गेलों. त्या जिनसा व माझ्या त्या कुत्र्याचें प्रेत हें गाडींत घातलें. मी आपल्या जिनसा गोळा करीत असतां विशेष सांगण्याजोगें असें कांहींएक घडलें नाहीं. फक्त जिन्यावरून वर खालीं जात असतां पहिल्याप्रमाणेंच माझ्यापुढें पावलें वाजत. जिनसा घेऊन तें भुताटकीचें घर सोडिल्यानंतर मी तसाच घराच्या मालकाकडे गेलों, व त्याच्या किल्ल्या त्याला देऊन म्हटलें, "आमची जिज्ञासा यथास्थित तृप्त झाली, व पुढें रात्रीं घडलेली सर्व हकीकत त्यास सांगणार तों एकदम परंतु सभ्यपणानें तो मला म्हणाला, "मला या घराच्या गोष्टी ऐकण्याचा अगदीं कंटाळा आला आहे. आजपर्यंत कोणीं तें गूढ उकलल्याचें कांहींच सांगितलें नाहीं. तेव्हां नुसते चमत्कार ऐकण्यांत कांहींच तात्पर्य नाहीं." तें त्याचें बोलणें मला खरें वाटलें; परंतु निदान त्या दोन पत्रांची तरी गोष्ट व तीं एकदम नाहींशीं झालीं कशीं, याची हकीकत त्याला सांगायचीच असा मीं निश्चय केला होता, व त्याप्रमाणें त्याला ती हकीकत सांगून विचारिलें कीं, "थोड्या दिवसांपूर्वीं जी म्हातारी त्या घरांत वारली त्या म्हातारीला तीं पत्रें कोणीं तरी लिहिलीं असावींत असें आपल्याला वाटतें कीं काय? त्या म्हातारीच्या पूर्वींच्या इतिहासांत कांहीं त्या पत्रांवरून तर्क होतो तसें संशय येण्याजोगें घडलें होतें कीं काय?" माझे हे प्रश्न ऐकून तो गृहस्थ दचकल्यासारखा झाला. थोड्याच वेळांत त्यानें उत्तर केलें, "त्या म्हातारीचा पूर्ववृत्तांत मला फारच थोडा माहीत आहे. तिच्या कुटुंबाची व आमच्या

कुटुंबाची फारा दिवसांची ओळख येवढेंच कायतें. तथापि आपल्या प्रश्नांवरून आतां मला फार दिवसांपूर्वी तिच्या-बद्दल लोक कांहीं बोलत असत खरे असें उगीच तुरळक आठवतें. मी शोध करून आपल्यास काय तें लौकरच कळवीन; परंतु लोकांच्या समजुतीप्रमाणें ज्याच्या हातून कांहीं भयंकर गुन्हा होतो तें माणूस मृत्यूनंतर भूत होऊन आपल्या गुन्ह्याच्या जागीं पुनः परत येतें असें जरी गृहीत धरलें, तरी एक गोष्ट लक्ष्यांत ठेविली पाहिजे कीं, म्हातारी त्या घरांत मरण्याच्या पूर्वींपासून भुताटकीचे चमत्कार होत होते. आपण हसतां आहांत, आपलें काय म्हणणें आहे?" मीं त्यास उत्तर दिलें, " माझें म्हणणें इतकेंच कीं, हें गूढ आपणास उकलतां आलें तर याच्या मुळाशीं कांहीं तरी मनुष्यकृति आपणास आढळेल अशी माझी खात्री झाली आहे."

" काय म्हणतां? हा सर्व फसवणुकीचा प्रकार आहे असें आपलें म्हणणें? फसवणूक ती काय म्हणून आणि ती कोण करीत आहे असें तुमचें म्हणणें?" त्या गृहस्थानें मला विचारलें.

" फसवणूक म्हणजे आपण साधारणतः समजतों तशी नव्हे. समजा कीं, मला अत्यंत गाढ झोंप लागली आहे, जींतून मला तुम्हांला जागें करतां येत नाहीं; परंतु त्या झोंपेंत मी जागेपणीं ज्यांचीं उत्तरें देऊं शकणार नाहीं तसल्या प्रश्नांचीं नेमकीं उत्तरें देऊं लागलों—तुमच्या खिशांत बरोबर पैसे किती आहेत तें सांगितलें, किंवा तुमच्या मनांत अमुक वेळीं काय विचार चालले आहेत हें सांगितलें—तर

ती फसवणूक झाली असें नव्हे, किंवा दैविक चमत्कार झाला असेंही नव्हे. मला नकळत मी कोणा तरी माझ्याहून दृढ इच्छाशक्तीच्या मनुष्याच्या ताब्यांत त्या वेळीं आहें असें समजावें. अशा दृढ विद्युन्मानसशक्तीच्या मनुष्यानें मजवर मेस्मेरिझमचा प्रयोग केला असावा असें मला वाटेल."

"पण अहो ! वशीकरणाचा प्रयोग करणारा मनुष्य दुसऱ्या मनुष्यावर प्रयोग करूं शकेल. म्हणून त्यास वस्तूही आपल्या वश करून घेतां येतील काय? खुर्च्या हलविणें, आपोआप दारें बंद करणें, अगर उघडणें या गोष्टी त्यास कशा करतां याव्या?"

"तशा खरोखर नाहीं होणार? परंतु तशा झाल्याचा भास आपणास होईल असें करितां येईल. आणि मी तर इतकें म्हणण्यास तयार आहें कीं, एका मनुष्याची दुसऱ्या मनुष्यावर जर मनःशक्ति चालते तर क्वचित् अचल पदार्थांवरही चालण्याचा संभव आहे. इतकेंच नव्हे तर मृत मनुष्यावर किंवा मृत मनुष्याच्या विचारांवर व स्मृतींवरही तो मनःशक्तीचा प्रभाव चालूं शकेल. ज्यास आपल्यांत योगाभ्यास म्हणतात, तो सर्वथा काल्पनिक किंवा असत्य होय असें मला वाटत नाहीं. तथापि मी त्यासंबंधानें कांहीं मत देण्याचें साहस करीत नाहीं. येवढेंच म्हणतों कीं, योगचमत्कार खरे असें ठरल्यास ते दैविक असें म्हणण्याची जरूर नाहीं. आज रसायनशास्त्राचें जितकें ज्ञान झालें आहे, तितक्यावरून हें उघड दिसतें कीं, फूल जाळून त्याची अगदीं राख केली तरी त्या फुलाचा आभास उत्पन्न करितां येतो. फुलांविषयीं वगैरे जर हें

खरें आहे, तर मनुष्याविषयींही कां खरें असूं नये? ज्या प्रमाणें पुष्पाचें पुष्पत्व तेवढें नाहीं, आभास मात्र दाखवितां येतो त्याचप्रमाणें मनुष्याचा आत्मा मात्र नाहीं; परंतु मृत मनुष्याचा आभास करितां येईल असें मानण्यास हरकत नाहीं. या मताप्रमाणें मला येवढेंच वाटतें कीं, भुतें खेतें वगैरे केवळ आभास होत. ते कोणातरी प्रबळ आत्म्यानें केले असून विशेष प्रकारच्या मनोबलाच्या माणसास मात्र दिसतात. एकाच ठिकाणीं दिसणारें भूत निरनिराळ्या माणसांस निरनिराळ्या प्रकारांनीं दिसतें. तुमच्या या घराचेंच असें आहे असें तुम्हीं मला सांगितलें. यावरून काय अनुमान निघतें कीं, एकाच चमत्काराचे निरनिराळ्या माणसांच्या मनावर त्याच्या मनःशक्तिप्रमाणें निरनिराळे आभास होतात.

माझा असा समज आहे कीं, तुमच्या या घरांत घडणारे चमत्कार कोणातरी प्रबल मनुष्याच्या मनःशक्तीचा निर्बल मनुष्याच्या मनःशक्तीवर होणारा प्रभाव होय. ज्याच्या मनःशक्तीचा हा प्रभाव तो अमुकच आभास उत्पन्न करावयाचा म्हणून करीत नाहीं. जर त्यांत खोट्याचा लेश असता तर एकच एक चमत्कार सर्व माणसांना सारखाच दिसता; परंतु ज्याच्या मनःशक्तीचा हा प्रभाव आहे त्याला अमुकच एक कांहीं करावयाचें आहे असें नाहीं. जें ज्यावेळीं कांहीं मनांत येईल त्याचा भास इतरास व्हावा अशी रचना दिसते. ही या माणसांची मनःशक्ति फार जबरदस्त वाईट करण्याविषयीं अत्यंत तत्पर अशी असली पाहिजे. त्या शक्तीच्या प्रभावानें माझा कुत्रा मेला व मी

जर कचरलों असतों, आपली इच्छाशक्ति जर तरतरीत ठेविली नसती तर मीही मेल्याखेरीज राहिलों नसतों!"

"काय म्हणतां? तुमचा कुत्रा मेला? हें मात्र फार भयंकर! त्या घरांत एक प्राणी कसा तो राहूं शकत नाहीं. कुत्र्यामांजरांचें तर असो, पण उंदीर, घुशी किंवा कीड मुंगीही तेथें क्षणमात्र टिकत नाहीं."

"पशूंचें उपजत ज्ञान त्यांस आपणास घातक अशी शक्ति कोठें आहे हें तेव्हांच सांगतें. मनुष्याला संकट आलें म्हणजे तें निवारण करण्याची जास्त ताकद असल्या-मुळें संकटाचें ज्ञान होण्याची तितकी आवश्यकता नसते. माझें म्हणणें काय तें मीं तुम्हांला सांगितलें, तें तुमच्या लक्ष्यांत आलें ना?

"आलें थोडेंसें! या चमत्काराचें कारण जरी कांहीं असलें तरी ते चमत्कार माझ्या घरांत होतात. आणि त्यामुळें घरांत एकही माणूस राहूं शकत नाहीं, ही गोष्ट जशीच्या तशीच कायम आहे. आतां त्या घराचें मी करूं काय हेंच मला समजत नाहीं."

"मी तुमच्या स्थितींत जर असतों तर काय केलें असतें तें ऐका. माझ्या मनाची अशी पक्की खात्री आहे कीं, आपल्या घरांत जे एकंदर चमत्कार होतात त्यांचें उगमस्थान आम्हीं कोंडून गेलों होतों ती खोली होय. माझें जर ऐकाल तर तुम्हीं त्या खोलीच्या भिंती पाडून टाकून व खालची जमीनही खणून काढून किंबहुना ती खोली नष्ट करून टाकाल तर फार चांगलें होईल. आणि ती खोली

एका बाजूलाच आहे त्याअर्थी ती उध्वस्त करण्यास तुम्हांला फारशी पंचाईत पडणार नाहीं."

"असें मीं केलें म्हणजे—"

"म्हणजे जें कांहीं खालीं तयार केलें असेल त्याचा एकंदर घराशीं संबंध नाहींसा होईल; व पुनः त्या घरांत हे असले चमत्कार घडणार नाहींत. पहा, तुम्हीं करून बघा. माझी मी म्हणतों याविषयीं इतकी खात्री आहे कीं, ती खोली उध्वस्त करण्यास तुम्हाला जो खर्च येईल त्यांतला निमा मी देण्यास तयार आहें."

"तसें कांहीं नाहीं. माझा मी खर्च करण्यास समर्थ आहें. पुढें काय विचार होईल तसें मी तुम्हाला पत्र लिहून कळवीन."

हें बोलणें झाल्यानंतर सुमारें दहा दिवसांनीं त्या घराच्या मालकाकडून मला एक पत्र आलें. त्या पत्रांत त्यानें असें लिहिलें होतें:—"माझें व आपलें बोलणें झाल्यानंतर मी एक वेळ त्या घरांत गेलों. आपण सांगितलेलीं तीं दोन पत्रें मला तेथें सांपडलीं. तीं आपणास जेथें सांपडलीं होतीं तेथेंच पहिल्याप्रमाणें मला आढळलीं. मीं तीं वाचून पाहिलीं व आपल्याप्रमाणेंच मलाही तीं वाचतांच शंका आली, तेव्हां मीं त्या म्हातारीच्या पूर्ववृत्तांताविषयीं सावधगिरीनें चौकशी चालविली. तीं पत्रें त्या बाईलाच लिहिलीं असावींत हा तर्क खरा आहे. त्या बाईचा वृत्तांत असा आहे:—

सुमारें ३६ वर्षांपूर्वीं त्या बाईनें घरच्या माणसांच्या मनाविरुद्ध एका डांबीस मनुष्याबरोबर पाट लाविला होता (तिचा पहिला नवरा लहानपणींच वारला होता.) तिचा हा दुसरा

नवरा भामट्या होता असें म्हटलें तरी चालेल. सर्व लोकांत तरी निदान त्याच्या संबंधानें तसा समज होता. ती स्वतः चांगल्या संभावित कुळांत जन्मकेली होती. तिला एक भाऊ होता. त्या भावाची बायको वारली असून त्याला एक सहा वर्षांचा मुलगा होता. या भावाजवळ बरेच पैसे आहेत अशी लोकांत वार्ता होती. हिचें लग्न झाल्यापासून एक महिन्याचे आंत या भावाचें प्रेत समुद्रांत बुडून कुजून व फुगून वर आलेलें असें आढळलें. त्या प्रेताची परीक्षा झाली तेव्हां त्याच्या अंगावर व विशेषतः गळ्याजवळ कांहीं गळफांसाच्या खुणा वगैरे दिसल्या. परंतु त्या बरोबर रीतीनें ओळखण्याजोग्या नसल्यामुळें कॉरोनरसाहेबांनीं बुडून मेलेला आढळला असाच निकाल दिला.

तो भाऊ मरतांच त्याचा मुलगा अर्थातच त्याच्या बहिणीच्या व मेहुण्याच्या स्वाधीन झाला. हा मुलगा आपल्या बापाचा वारस. तो जर नष्ट झाला तर ती सगळी इस्टेट त्या बहिणीकडे येणार होती. सहा महिन्यांनींच तें पोरही आटपलें. लोकांत अशी समजूत झाली होती कीं, त्याला खायाला प्यायाला न मिळाल्यामुळें केवळ उपासमारीनें व हयगयीनें तें पोर मेलें असावें. शेजारी पाजारी लोकांनीं इतकें देखील सांगितलें कीं, आपणास रात्रींच्या त्या पोराच्या किंकाळ्या नेहमीं ऐकूं येत. मरणानंतर संशय निघाले म्हणून कॉरोनरनें त्या पोराच्या प्रेताची तपासणी केली, तेव्हां तें उपासमार झाल्यामुळें मेलें असाच निकाल दिला. आणि त्याचे अंगावर मारहाण केल्याच्या खुणाही दिसत होत्या असाही रिपोर्ट केला; परंतु त्या रिपोर्टापासून पुढें

कांहींच निष्पन्न झालें नाहीं. तें पोर एके दिवशीं पळून जाण्याचा यत्न करीत असतां दुसऱ्या मजल्याच्या भिंतीवरून खालीं पडलें. अशा प्रकारचा कांहीं पुरावा करून त्या नवराबायकोंनीं पोराचा खून जिरविला. कसेंही जरी असलें तरी तें पोर मरून त्याच्या बापाचे पैसे या दोघांस मिळाले खरे. पुढें थोडयाच दिवसांनीं तिच्या नवऱ्यानें समुद्रावर चोऱ्या करण्याचा धंदा आरंभिला. आणि एके दिवशीं त्याची होडी एकाएकीं एका तारवावर आपटून त्याच्यासकट बुडाली. ही बाई त्याची बायको आतां एकटीच राहिली व तिच्याजवळ पैसेही पण पुष्कळ राहिले होते. परंतु एका मागून एक, चोऱ्यामाऱ्या वगैरे अनेक संकटें तिजवर येऊन ती अगदीं दरिद्री झाली व तिची अन्नान्न दशा होऊन शेवटीं ज्या आमच्या घरांत ती भाडें देऊन मालकीनें राहत असे, त्याच घरांत ती झाडलोट करून स्वस्थ राहण्या-पर्यंत तिची मजल येऊन ठेपली."

घराच्या मालकानें येवढी हकीकत लिहून पुढें असेंही लिहिलें होतें कीं, "मी त्या विलक्षण खोलींत कांहीं वेळ घालविला. व तेथें असतांना मी इतका भेदरून गेलों कीं, तुम्हीं सांगितलेल्या मसलतीची आठवण होऊन मीं ताबड-तोब त्या भिंती खणून काढण्याचा निश्चय केला. चार मजूरही बोलाविले आहेत. तुम्ही सांगाल ते दिवशीं आरंभ करूं."

दिवस लागलींच नेमला. मी त्या भुताटकीच्या घरांत गेलों व त्या भयंकर अंधाऱ्या खोलींत जाऊन तिच्या भिंती व जमीन खणून काढण्याचा निश्चय केला. थोडीशी जमीन

म्हणली नाहीं तोंच आम्हांस एक चोरदार लागलें. सहज एक मनुष्य आंत जाईल इतक्या बेताचें असें तें नजरेस आलें. तें खिळे, पट्ट्या वगैरे मारून अगदीं पक्कें बसवून टाकिलें होतें. आम्हीं ते खिळे, पट्ट्या वगैरे सर्व उचकटून टाकिल्या आणि आंत उतरलों तों एका खोलींत गेलों. अशी खोली तेथें असेल अशी कल्पना सुद्धां कोणास झाली नव्हती. या खोलीमध्यें एका बाजूस एक खिडकी व पलीकडे एक धुराडयासारखें कांहीं होतें; परंतु तीं दोन्ही बऱ्याच वर्षांपूर्वी विटांनीं लिंपून टाकिलीं असावीं. पलिते घेऊन आम्हीं ही खोली तपासण्यास आरंभ केला; परंतु आंत फारच जुन्या काळचें म्हणजे, सुमारें शंभर वर्षांचें म्हणाना, सामान होतें, व त्याच वेळचे कोणातरी श्रीमंत मनुष्याचे कपडे पडलेले होते. ते कपडे अर्थातच आतां हात लावला कीं तुकडे पडण्याजोगे झाले होते. तेथें एक जुन्या काळची तरवार पडलेली होती व एका जरीच्या फडक्यांत पांच मोहोरा व कांहीं जुन्या शिक्क्यांची रुप्याचीं नाणींही सांपडलीं. आमच्या एकंदर टेहळणींत जें काय विशेष अत्यंत महत्त्वाचें वाटलें तें एका कोपऱ्यांतलें लोखंडी दाराचें फडताळ होय. त्याचीं दारें उघडण्यास आम्हांला अतोनात श्रम पडले. उघडून पाहतों तों त्यांत तीन खण असून, आणखी खालीं दोन झांकलेलीं पुडें होतीं. त्या तीन खणांवर कांचेच्या कुप्या तोंडें अगदीं मोहोरबंद केलेल्या अशा ठेविलेल्या होत्या. या कुप्यांतून रंगहीन असे कांहीं प्रवाही पदार्थ दिसले. या बाटल्यांच्या जवळच विलक्षण आकृतीच्या कांचेच्या नळ्या होत्या, आणि एक बारीक अणीदार लोखंडी सळई

कांहीं प्रकारचें सैंधवही तेथें पडलेले असून एक भला थोरला लोहचुंबकाचा धोंडाही तेथें पडलेला होता. खालच्या पुडांपैकीं एका पुडांत एक सोनेरी चौकटींत बसविलेली अगदीं लहानशी तसबीर होती; परंतु तिचे निरनिराळे रंग अणुमात्र खराब झालेले नव्हते. ती तसबीर त्या खोलींत इतकीं वर्षें अशी पडलेली असून जेव्हां तिचे रंग जसेचे तसे ताजेच दिसत होते, तेव्हां आश्चर्यकारकच गोष्ट खरी. ती तसबीर एका पोक्त वयाच्या माणसाची म्हणजे सुमारें ४७।४८ वर्षांचे वयाच्या माणसाची असावी.

चेहरा मोठा विशेष लक्ष्यांत ठसण्यासारखा होता. एकदां पाहिला कीं, कधींही विसरण्याजोगा नव्हे. एखाद्या मोठ्या थोरल्या सर्पाला एकदम मनुष्याचें रूप आलें व त्या रूपांतही सर्पाचा नैसर्गिक दुष्टपणा दिसूं लागला असतां जसें रूप दिसेल तसेंच हुबेहूब त्या तसबिरींतील रूप होतें, एवढें सांगितल्यानें जी कोणासही कल्पना येईल ती शेंकडों वर्णनांनींही येऊं शकणें नाहीं. पुढचा भाग अतिशय रुंद व जरा थबकडा असा होता. परंतु ते हिरवट डोळे चांगले विस्तीर्ण दिसत असून इतके भयंकर दिसत कीं, या पुरुषाच्या अंतःकरणांत दयेचा लेशही नसावा असें दाखवीत असत. एकंदर चेहरा अगदीं शांत परंतु क्रूर असा दिसत असून आपल्या अंगीं असणाऱ्या अद्वितीय बळाबद्दल त्या मनुष्यास पूर्ण खात्री असावी असें दिसे. तसबीर हातीं येतांच मीं ती मागें पुढें वळवून पाहिली. तिच्या पाठीमागल्या बाजूस कांहीं अक्षरें लिहिलेलीं होतीं परंतु तीं चांगलींशीं लागेनात. तथापि एक नांव मात्र लागलें. तें

नांव मी येथें सांगत नाहीं. त्याबद्दल एवढेंच सांगतों कीं, त्या नांवाच्या गृहस्थानें आपल्या स्वतःच्या घरांत आपल्या बायकोचा व आपल्या एका स्नेह्याचा एकदम खून केला व सरकारचें धरणें टाळण्यासाठीं त्यास पुढें देशत्याग करावा लागला. ही हकीकत कांहीं एक न बोलतां, मीं ती तसबीर घरवाल्या गृहस्थाच्या हातांत दिली व दुसऱ्या कामाकडे वळलों. पहिलें पूड उघडतांना आम्हांस फारशी अडचण पडली नव्हती. दुसरें उघडण्याचे वेळीं अतोनात त्रास झाला. तथापि खूब खटपट करून पण तें पूड आम्हीं उघडलेंच. या पुडांत पाहिलें तें कांहीं चमत्कारिकच आमच्या नजरेस आलें. जें जें कांहीं दिसलें तें तें मोठ्या सुव्यवस्थित तऱ्हेनें रचिलेलें होते. एका लहानशा पाटीवर एक ताम्हनाच्या आकाराचें कांचेचें पात्र असून त्यांत अतिशय स्वच्छ असा पाण्यासारखा पातळ पदार्थ घातलेला होता व त्यावर एक सुई एकसारखी गरगर फिरत होती. त्या पुडांतून कांहीं चमत्कारिक तऱ्हेचा, परंतु वाईट नव्हे असा वास येत होता व हा वास फार उग्रही नव्हता. तो वास कोठून येत असेल तो येवो; परंतु तो माझ्या नाकांत भरल्याबरोबर माझी घाबरल्यासारखी अवस्था होऊन नखशिखांत अंगावर शहारे उठले. माझी एकट्याचीच अशी स्थिति झाली असें नाहीं, तर आम्ही जितकेजण त्या खोलींत होतों, तितक्यांची अशी स्थिति झाली. ज्या पाटीवर तें कांचेचें पात्र ठेविलें होतें, ती पाटी काय आहे हें पाहण्याची मला इतकी उत्कंठा झाली होती कीं, मीं एकदम तें कांचेचें पात्र उचलूं लागलों तों पाण्यांतील सुई फारच

जलद फेरे करूं लागली व मी हात घालून तें भांडें उचलतांच मला एकदम इतका धक्का बसला कीं, भांडें हातांतून एकदम गळून पडलें. त्यांतलें तें पाणी सांडलें, भांडें फुटलें, ती सुई गडबडा लोळत खोलीच्या एका कोंपऱ्यांत गेली आणि खोलीच्या चारी भिंती खूप जोरानें हादरल्या. ते मजूर घाबरून पळूं लागले परंतु पुढें कांहीं विशेष न घडल्यामुळें ते परतले. इकडे त्या कांचेच्या भांड्याखालची ती दगडी पाटी मी उचलून नीट पाहिली तों तिच्यावर कांहीं चमत्कारिक अक्षरें खोदलेलीं दिसलीं. शिलालेख वाचण्यांत निपुण अशा एका गृहस्थास तीं मीं दाखविलीं. तेव्हां त्यानें अत्यंत जुन्या अशा भाषेंत पुढील अर्थाचें वाक्य वाचून दाखविलें. "या आवाराच्या आंत जे कोणी येतील, मग ते सचेतन असोत अगर अचेतन असोत, त्यांचे मनावर, ही सुई फिरत आहे तोंवर माझ्या मनोबलाचा प्रभाव चालो."

यानंतर आम्हांस आणखी कांहींएक सांपडलें नांहीं. घराच्या मालकानें ती खोली जमीनदोस्त करून टाकिली व आतां त्या घरांत रहावयास येणारे भाडोत्री सुखासमाधानानें राहतात. मात्र भाडोत्र्यांस देण्याच्या पूर्वीं चार महिने तो स्वतः त्या घरांत जाऊन राहिला होता.

POONA UNIVERSITY LIBRARY

रा. त्र्यंबक रामचंद्र लुकतुके यांचें

प्रपंचशास्त्र.

संसारांत हरघडी उपयोगी पडण्यासारखे सर्व विषय यांत आहेत, ज्या गृहस्थाला उत्तम संसारी मनुष्य व्हावयाचें असेल, त्यानें हें पुस्तक आपणांजवळ नेहमीं बाळगून त्यांतील सूचना आपल्या बायकोकडून अमलांत आणिल्या पाहिजेत व प्रत्येक विवाहित स्त्रीनें या पुस्तकांतील नियमांप्रमाणें वर्तन केलें तर ती खरोखरच "घरची लक्ष्मी," "नवऱ्याची लाडकी," "मुलाबाळांची सर्वोत्तम आई" व "नोकरचाकरांची धन्य धन्य धनीण" होईल, यांत कांहीं शंका नाहीं. आम्ही म्हणतों त्याचें प्रत्यंतर त्यांतील ठोकळ ठोकळ विषयांची यादी खालीं दिली आहे, ती वाचून येण्याजोगें आहे. सांचा १२ पेजी. पृष्ठें २५० कापडी पुठ्ठा. किंमत १ रुपया, टपालहांशील निराळें.

मुख्य मुख्य विषयांची यादी.

रहाण्याची जागा–गृहकृत्यांची जबाबदारी.–भांडीं कशीं व कोठें ठेवावीं?–कोठी–भोजनाची जागा.–आमचे भोजनसमारंभ.–प्रौढ मुलें आणि मुली.–शेज आणि शेजघर.–झोंप व तिची अवश्यकता.–मळमूत्राची जागा.–गटारें व मोऱ्या.–घरकामाचे नौकर.–हरकामांची रोजनिशी.–गाई व म्हशी.–आंगण झाडणें–बैठकीवर पडलेले मेणबत्तीचे डाग कसे काढावे?–अंथरुण गोळा करणें.–घरच्या मंडळ्याची न्याहारी–कपडे धुण्याचे नियम–बागबगीचा.–संध्याकाळीं घर झाडणें.–समया, पणत्या, कंदील वगैरे मेणबत्तीचे दिवे.–रोषनाई व बिछाने–स्वयंपाक घरांतील नोकर.–सण, मेजवान्या, पाहुणचार.–जमा खर्च.–पैसा कोठें ठेवावा.–बाजार करणें व सालबेगमी.–चांगले कपडे कोणते?–कपडे जतन कसे करावे?–घराला शोभा आणणारें सामान.–स्त्रीवर्गाचें व्यवसाय.–लहान मुलांची आणि आजारी मनुष्याची शुश्रुषा.–चहा, कॉफी, कोको.– लहान मुलांचे अन्न व कपडे.–प्रवासाविषयीं सर्व कांहीं.

बाबाजी सखाराम आणि कंपनी, मुंबई.

गोविंदरावांचीं आपल्या मुलास

पत्रें.

अश्विन महिन्याचे

' घटकाभर करमणुकी 'चे अंकांत

प्रसिद्ध होतील.

बाबाजी सखाराम आणि **कंपनी,**

मुंबई.

T. V. PRESS.